




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. १० जानेवारी २०२६



दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर

आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस

जनरेटर विक्री व दुरस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए

Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे • नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 • पाने : ४ • वर्ष : ४थे • अंक : ०५४ • किंमत : ४ रूपये • Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# २६ पदाधिकारी ६ वर्षांसाठी निलंबित

**BJPची गटबाजीवर करडी नजर, बंडखोर-असंतुष्टांवर 'स्पेशल वॉच'**

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

भाजपने बंडखोरीविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. पालिका निवडणुकीसाठी महायुतीच्या अधिकृत उमेदवारांना सहकार्य न केल्याने काही माजी नगरसेवकांसह २६ पदाधिकाऱ्यांचे सहा वर्षांसाठी निलंबन करण्यात आले आहे. मुंबई भाजप अध्यक्ष आमदार अमित साटम यांनी हा निलंबन आदेश जारी केला आहे. पक्षाने वारंवार विनंती करूनही संबंधित पदाधिकारी महायुतीच्या उमेदवारांना सहकार्य करीत नसल्याने ही शिस्तभंगाची कारवाई करण्यात आल्याचे साटम यांनी स्पष्ट केले आहे. निलंबितांमध्ये वॉर्ड क्रमांक ६० (वर्सोवा) येथील दिव्या ढोले, वॉर्ड १७७ (माटुंगा) येथील नेहल शहा, वॉर्ड २०५ (अभ्युदय नगर) येथील जान्हवी राणे आणि वॉर्ड १३ (बोरिवली) येथील आसावरी पाटील यांचा समावेश आहे. याशिवाय पक्षविरोधी कारवाया केल्याचा आरोप असलेल्या इतरही अनेक पदाधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

काही भाजप नेत्यांनी ही कारवाई उशिरा झाल्याची म्हटले आहे. गेल्या आठवड्यात पक्षाने काही बंडखोरांना माघार घेण्यात यश मिळविले. वॉर्ड १ मधून अपक्ष म्हणून अर्ज दाखल केलेल्या सुनीता यादव, प्रभाग २०० मधून गजेंद्र धुमाळे यांनी उमेदवारी मागे घेतली, तर वॉर्ड २२१ मध्ये माजी नगरसेवक जनक संघवी यांनी माघार घेतल्याने आकाश पुरोहित हे अधिकृत भाजप उमेदवार राहिले आहेत.

भाजप अंतर्गत जिथे मोठ्या प्रमाणात गटबाजी आहे तिथे नजर ठेवण्यासाठी प्रदेश भाजपने समांतर यंत्रणा राबविली असल्याची माहिती आहे. काही विशिष्ट कार्यकर्ते, नेते यांना त्यासाठी विशेष जबाबदारी देण्यात आली आहे. त्यापैकी काहीजण हे त्या-त्या शहरातील आहेत तर काही बाहेरचे आहेत.

सोलापूर, अमरावती, चंद्रपूर आदी शहरांचा त्यामध्ये प्रामुख्याने



समावेश आहे. सोलापूरमध्ये पूर्वी आ. सुभाष देशमुख आणि आ. विजय देशमुख यांच्यात संघर्ष होता पण आता तो नसला तरी बाहेरून आलेले पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आ. सचिन कल्याणशेट्टी विरुद्ध देशमुख आमदारद्वय असे काहीसे चित्र दिसते. तेथेही वरून 'वॉच' ठेवला जात आहे.

अमरावतीमध्ये भाजप आणि आ. रवी राणा यांच्या पक्षाची युती असली तरी काही जागांवर दोन पक्षांत लढतही होत आहे. या परिस्थितीत माजी खा. नवनीत राणा यांच्या भूमिकेवर वरून लक्ष ठेवले जात असल्याचे कळते. कोण, कुठे आणि कशी गडबड करत आहे याचे रिपोर्ट्स रोज रात्री वर पोहोचतात म्हणे!

दरम्यान, चंद्रपूर येथील भाजपच्या बंडखोर कार्यकर्त्यांच्या हालचालींवर पक्षाकडून विशेष लक्ष ठेवण्यात येत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रपुरात रोड शोमध्ये एका बाजूला आ. सुधीर मुनगंटीवार, तर दुसऱ्या बाजूला आ. किशोर जोरगेवार दिसून आले.

# उकळत्या तेलाची कढई उडविल्याने चार ते पाच जण भाजले

■ रत्नागिरीत उनाड गाईचा धक्कादायक प्रकार

**रत्नागिरी : (समर्थ गांवकरी)**

रत्नागिरी शहरातील राम आळी नाका परिसरात एक धक्कादायक घटना घडली. चिप्स बनविणाऱ्या दुकानासमोर उकळत्या तेलाची कढईत अचानक आलेल्या गाईने तोंड घालून कढई उडाल्याने आजूबाजूचे चार ते पाच नागरिक गंभीररीत्या भाजले. या घटनेत संबंधित गाय देखील भाजली आहे. राम आळी नाक्यावरील एका दुकानासमोर उकळत्या तेलात चिप्स बनविण्याचे काम सुरू असताना अचानक एक उनाड गाय त्या ठिकाणी आली. उकळत्या तेलाच्या कढईकडे तोंड घालताच ती गाय चांगलीच भाजली. वेदनेमुळे संतप्त झालेल्या गाईने शिंगाने कढई उडवली.



त्यामुळे उकळते तेल आजूबाजूला उडून या परिसरात उपस्थित असलेले चार ते पाच जण भाजले. घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. जखमी नागरिकांना तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सुदैवाने कोणाचीही प्रकृती गंभीर नसल्याचे समजते.

या घटनेमुळे शहरातील उनाड गुरांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. शहरात मोकाट फिरणाऱ्या गुरांमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, यापूर्वीही अशा घटनांमुळे अपघात घडले आहेत.

मात्र नगरपालिकेकडून या समस्येकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

या प्रकारामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. मोकाट गुरांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# गुंड नीलेश घायवळ पासपोर्टबाबत माझ्याशी बोला

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भाजपने पुणे आणि पिंपरी-चिंचवड या शहरांची अक्षरशः वाताहत केली आहे. शहराचा ज्या पद्धतीने सत्ताधाऱ्यांनी विकास करायला पाहिजे होता, तसा केला नाही. 'महापालिका निवडणुकीत भाजप निवडून आला नाही, तर खापर आपल्यावरच फुटेल म्हणून केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ घाबरले आहेत. गुंड नीलेश घायवळ याला पासपोर्ट देण्याच्या विषयावरून मोहोळ उपमुख्यमंत्री अजित पवार यांना चॅलेंज करत आहेत. अजित पवार यांना कशाला चॅलेंज करता, गुंडाच्या पासपोर्टविषयी मीच तुमच्याशी बोलायला तयार आहे,' असे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे निवडणूक प्रभारी व आमदार रोहित पवार यांनी मोहोळ यांना दिले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांचा पवार यांच्याकडून वारजे येथे प्रचार करण्यात आला. त्यावेळी रोहित पवार बोलत होते. ते म्हणाले, जैन बोर्डिंग प्रकरणावरून पवार यांनी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना धारेवर धरले. 'मोहोळ यांचा दिल्लीमध्ये चांगला संपर्क वाढला आहे. त्यांच्या या संपर्कवाढीतूनच त्यांचा नेमका कोणी गेम केला, हेसुद्धा आम्ही सांगू शकतो. शहरात कोणताही प्रकल्प सुरू करण्यापूर्वी अगोदर त्यांची परवानगी घ्यावी लागते. याबाबतच अजित पवार हे आपली भूमिका मांडत होते. भाजपकडून शहरात सुरू असलेल्या बांधकाम प्रकल्प, विविध प्रकारच्या व्यवसायांना अडचणीत आणण्याचे काम केले जात आहे. फोन करून अडचण करू, अशा धमक्या दिल्या जात आहेत.

# निवडणुकीत ७१४९ मतदान यंत्रे आणि २९०० कंट्रोल युनिट

**पिंपरी (समर्थ गांवकरी)**

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी येत्या १५ जानेवारीला मतदान होणार आहे. त्यासाठी पाच दिवसांचा कालावधी राहिला आहे. प्रशासनाने सर्व यंत्रणा सज्ज केली असून, तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. या निवडणुकीसाठी २ हजार ६७ मतदान केंद्रे आहेत, तर मतमोजणी शुक्रवारी (दि.१६) आठ ठिकाणी होणार आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेसाठी ३२ प्रभागांत १२८ जागा असून, ६९२ उमेदवार रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक ६ व १० मधून अनुक्रमे भाजपचे रवी लांडगे आणि सुप्रिया चांदगुडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे आता १२६ जागांसाठी मतदान होत आहे. या निवडणुकीसाठी १० हजार ३३५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शहरात २ हजार ६७ मतदान केंद्रांमध्ये ७ हजार १४९ मतदान यंत्र (बॅलेट यूनिट), तर २ हजार ९०० कंट्रोल युनिट आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर १ केंद्राध्यक्ष, ३ मतदार अधिकारी, १ शिपाई असेल. केंद्रांकरिता साहित्याचे किट तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे. या निवडणुकीसाठी ५२१ वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यात पीएमपीएमएल बसेसचा समावेश आहे. निवडणुकीत निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतदानाची सोय केली आहे. ही प्रक्रिया सुरु आहे. महापालिकेच्या मुख्य इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर टपाली मतदानाची सोय करण्यात आली आहे. महापालिका निवडणुकीसाठी काही मतदानयंत्रांमध्ये उमेदवारांच्या प्रतिनिधीसमोर मतपत्रिका सील करण्यास काही ठिकाणी सुरुवात झाली आहे.

# संवेदनशील मतदान केंद्र ९०६, २६ हजार कर्मचारी व ४१०० पोलिस तैनात



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुणे महापालिका निवडणुकीसाठी ४ हजार ११ मतदान केंद्र आहेत. त्यात ९०६ संवेदनशील मतदान केंद्र आहेत. या संवेदनशील मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरा, पोलिसांचे जादा मन्युष्यबळ तैनात करून कडेकोट बंदोबस्त ठेवला जाणार आहे. या निवडणुकीच्या मतदान केंद्रासाठी २६ हजार कर्मचारी आणि ४ हजार १०० पोलिसांचा बंदोबस्त तैनात असणार आहे. पुणे महापालिकेचे आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी नवल किशोर राम यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उपायुक्त प्रसाद काटकर, रवी पवार, तुषार बाबर आदी उपस्थित होते. पुणे महापालिका निवडणुकीसाठी एकूण नियुक्त क्षेत्रीय अधिकारी संख्या ४५४ आहे. १४ हजार ५०० मतदान यंत्र (बॅलेट युनिट), तर ५ हजार ५०० कंट्रोल युनिट आहेत. या निवडणुकीसाठी १७२ पथके स्थापन करण्यात आली आहेत.

पुणे महापालिका निवडणुकीत सुमारे १२ हजार टपाली मतपत्रिकाकरिता मागणी नोंदविली असून त्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे. पुणे महापालिका निवडणुकीसाठी १४ हजार ५०० मतदान यंत्र (बॅलेट युनिट) आहेत. त्यापैकी काही मतदानयंत्रांमध्ये उमेदवारांच्या प्रतिनिधीसमोर मतपत्रिका सील करण्यास काही ठिकाणी सुरुवात झाली आहे. प्रत्येक प्रभागामध्ये महिला मतदान केंद्र आणि प्रत्येक प्रभागामध्ये आदर्श मतदान केंद्र प्रत्येकी दोन केंद्र असणार आहेत, असे आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.

पुणे महापालिकेच्या निवडणुकीची मतमोजणी १६ जानेवारी रोजी होणार आहे. मतमोजणीसाठी १ हजार १०० कर्मचारी नेमले आहेत.

**मतदानांच्या दिवशी ४५ रुग्णवाहिका**

महापालिका निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय येथे रुग्णवाहिकेसहित १५ वैद्यकीय पथक उपलब्ध करून देण्यात आले आहे. मतदानाच्या दिवशी पालिकेच्या १५ रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. १५ क्षेत्रीय कार्यालयाकडे बूथनिहाय स्टाफ, नर्स आणि आशा कार्यकर्त्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी १५
सहायक निवडणूक निर्णय अधिकारी ३५
आचारसंहिता पथके ६५
क्षेत्रीय अधिकारी ३३८
एकूण बस ८६०
सुमो /जीप २५०

# मेट्रो-बस मोफत देणार; संधी द्यावी - अजित पवार

**वाहतूक कोंडीमुळे हजारो कोटींचे नुकसान**

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुण्यासाठी पाणी, वाहतूक, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण आणि सुरक्षितता या सर्व मुद्द्यांवर ठोस काम करण्याची माझी तयारी आहे. हा जाहीरनामा कागदापुरता मर्यादित राहणार नाही असा ठाम विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी पुणेकरांना दिला. पुण्यात पाण्याच्या समस्येसाठी यापूर्वी २ हजार ८१५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले, मात्र अद्याप अनेक ठिकाणी पाण्याच्या टाक्या बसवण्यात आलेल्या नाहीत, याकडे त्यांनी लक्ष वेधले. पाण्याच्या ३३ मिसिंग लिंक एकत्रित करून पुण्याची पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. अजित पवार म्हणाले की, वाहतूक कोंडीत पुणे जगात चौथ्या क्रमांकावर आहे. वाहतूक कोंडीमुळे दरमहा साडेसात कोटी रुपयांचे इंधन वाया जाते, तर वर्षाला तब्बल १० हजार ८०० कोटी रुपयांचा फटका पुणेकरांना बसतो. यावर उपाय म्हणून पीएमपीएमएल बस आणि मेट्रो मोफत करण्याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेसने घेतल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी पुणे महापालिकेला



दरवर्षी सुमारे पाच कोटी रुपये द्यावे लागतील, मात्र वाहनसंख्या कमी झाल्याने प्रदूषणात मोठी घट होईल, असा दावा त्यांनी केला. "स्वच्छतेची मला विशेष आवड आहे. लोकांना आकर्षित केल्याशिवाय स्वच्छतेत बदल होत नाही," असे सांगत पुणे स्वच्छ ठेवण्यासाठी विशेष मोहिमा राबवण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुणेकर पर्यावरण आणि प्रदूषणाबाबत जागरूक असल्याचे सांगत, शहराचा बकालपणा कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील, असेही ते म्हणाले.

# 'पैसा फेको.. तमाशा देखो' अशी भाजपची स्थिती

**काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची टीका**

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

महापालिका निवडणुका या स्थानिक प्रश्नांवर लढवण्याऐवजी भारतीय जनता पक्ष खान की बाण, उर्दू की मराठी, उत्तर प्रदेश की महाराष्ट्र अशा विभाजनवादी प्रश्नांवर निवडणूक लढवीत आहे. भाजपने गेल्या सत्ताकाळात कोणतीही कामे केली नसल्याने त्यांना या मुद्द्यांचा आधार घ्यावा लागत आहे. पैसा फेको आणि तमाशा देखो अशी स्थिती भाजपची झाली असून, कमिशनखोरी, कोयता गँगच्या माध्यमातून गुंडांना पाठबळ, जमिनी लाटणे असे प्रकार सुरू आहेत. देवा भाऊ लाडक्या बहिणींना दीड हजार रुपये देऊन केसाने गळा कापत आहे. त्यामुळे तो देवा भाऊ नसून मेवा भाऊ आहे, अशी जळजळीत टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. भाजपसोबत सत्तेत असलेले अजित पवार आता त्यांच्यावर टीका करीत आहे. मात्र, त्यांनी राजीनामा देऊन स्पष्ट भूमिका घ्यावी, असेही ते म्हणाले. काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. प्रदेश काँग्रेसचे खजिनदार अभय छाजेड, प्रवक्ते गोपाळ तिवारी यावेळी उपस्थित होते. सपकाळ म्हणाले, पुण्यात पाणीपुरवठा, साफसफाई, कचरा, पथदिवे, वाहतूक हे मुद्दे महत्त्वाचे असताना निवडणूक भलत्याच मुद्द्यांवर लढवली जात



आहे. अजित पवार एकीकडे सत्तेत असताना भाजपवर टीका करीत आहेत. त्यामुळे ही नुरा कुस्ती असून, अजित पवार यांनी आता राजीनामा देऊन भाजपविरोधात स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे. माल खाताना एकत्र; तर शिव्या देताना मात्र, वेगळी भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यांना स्वाभिमान असल्यास तातडीने सत्तेबाहेर यावे.

## थोडक्यात...



### दहावी, बारावीच्या परीक्षेबाबत मोठा निर्णय

पुणे (समर्थ गांवकरी) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा निकोप, गुणवत्तापूर्ण वातावरणात होण्यासाठी आता राज्यस्तरीय दक्षता समिती नियुक्त करण्यात आली आहे. या परीक्षांवेळी कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबवण्याबरोबरच तणावमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्याची जबाबदारी राज्यस्तरीय दक्षता समितीवर सोपवण्यात आली असून, परीक्षेदरम्यान गैरप्रकार रोखण्यासाठी सीसीटीव्हीचे नियंत्रण जिल्हा प्रशासनाकडे असेल.

### भाजपचे चाललंय काय?

मुंबई (समर्थ गांवकरी) : बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील एका सहआरोपीला भाजपने स्वीकृत नगरसेवक पद दिल्यामुळे एकच खळबळ माजली आहे. या प्रकरणी विरोधकांनी विशेषतः शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने भाजपवर टीकेची झोड उठवत गुन्हेगारी प्रवृत्तीला पोसणे हाच भाजपचा खरा अजेंडा असल्याचा आरोप केला आहे. बदलापूर येथील एका नामांकित शाळेत काही महिन्यांपूर्वी 2 चिमुकल्यांवर लैंगिक अत्याचार झाला होता. या प्रकरणी शाळेतील स्वच्छता कर्मचारी अक्षय शिंदे याला अटक करण्यात आली होती. या प्रकरणाचे राज्यभरात तीव्र पडसाद उमटले होते. बदलापूरकरांनी या घटनेविरोधात तीव्र निदर्शने केली होती. रस्ते व रेल्वे वाहतूक रोखून धरली होती. यामुळे बदलापूर येथील जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले होते. या प्रकरणात पोलिसानी अक्षय शिंदेसह तुषार आपटे विरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर आता भाजपने तुषार आपटेला थेट कुळगाव बदलापूर नगरपालिकेत स्वीकृत नगरसेवक पद बहाल केल्यामुळे एकच खळबळ माजली आहे. ठाकरे गटाचे आमदार तथा विधानपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या प्रकरणी भाजपवर टीकेची झोड उठवली आहे. ते म्हणाले, बदलापूरच्या चिमुरड्यांवरील अत्याचार प्रकरणातील सह-आरोपी तुषार आपटेला 'पार्टी विथ डिफरन्स'कडून थेट स्वीकृत नगरसेवक पद! आता जनतेला समजले असेलच की घटनेच्या 44 दिवसांनंतर त्याला अटक का झाली! आधी एमआयएम, मग काँग्रेससोबत युती आणि आता आरोपींना राजाश्रय... हा भाजपच्या मनमानी कारभाराचा 'तिसरा एपिसोड' आहे.

# रमेश खरमाळे यांचे पर्यावरण संवर्धनावर प्रभावी मार्गदर्शन!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर येथील माजी सैनिक रमेश गणपत खरमाळे यांनी भारतीय सैन्य दलात १७ वर्षे देशसेवा बजावून सन २०१२ मध्ये सन्मानपूर्वक निवृत्ती स्वीकारली. निवृत्तीनंतर त्यांनी पर्यावरण संवर्धन, सामाजिक कार्य, शिक्षण, इतिहास संवर्धन व युवक प्रेरणा या क्षेत्रांत केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळविला आहे.



अकोले तालुक्यातील विविध शाळांमध्ये त्यांनी "पर्यावरण संवर्धन" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हा उपक्रम वनविभाग राजूरचे डी. डी. पडवळे, अकोले पंचायत समितीचे गटविकास अधिकारी माने साहेब, गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, सरपंच यमाजी भांगरे, १००८ महामंडलेश्वर कोंडार महाराज तसेच पर्यावरण प्रेमी ग्रुपचे अध्यक्ष राहुल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

या उपक्रमांतर्गत सह्याद्री व्हॅली इंग्लिश मीडियम स्कूल व गुरुवर्य रा. वी. पाटणकर सर्वोदय विद्यामंदिर (राजूर), समर्थ माध्यमिक विद्यालय, पोलीस व सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र – मवेशी, शासकीय माध्यमिक आश्रम शाळा मवेशी, शासकीय माध्यमिक व इंग्रजी माध्यम आश्रम शाळा, जिल्हा परिषद शाळा पुरुषवाडी, शासकीय आदर्श आश्रम शाळा भंडारदरा कॅम्प तसेच एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल, मवेशी येथे कार्यक्रम पार पडले.

मार्गदर्शन करताना खरमाळे यांनी निसर्ग व मानव यांचा अतूट सहसंबंध सोप्या व मनोरंजक पद्धतीने स्पष्ट केला. पर्यावरण संवर्धन ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. हवेतील कार्बनचे वाढते प्रमाण आणि त्यामुळे जीवसृष्टीवर होणारे दुष्परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना सखोल माहिती देण्यात आली. धार्मिक व सामाजिक परंपरांना नैसर्गिक कारणांची जोड देत पर्यावरण विषयक प्रभावी जनजागृती करण्यात आली.

या उपक्रमासाठी संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच पर्यावरण प्रेमी ग्रुपचे दत्ता लांघी, रमेश लेंभे, भरत बांबळे (मेजर), बांगर सर, दत्ता कोंडार व सुनील बांडे यांचे सहकार्य उल्लेखनीय ठरले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले.

# रामदास शिंगाडे यांनी सभासदांचा आवाज बनावे – सचिन झगडे

## रामदास शिंगाडे यांचा 'रयत सेवक समिती' कडून सन्मान



**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील संकुलातील महादजी शिंदे विद्यालयात कार्यरत असणारे रामदास शिंगाडे यांची रयत सेवक बँकेच्या कर्जत शाखेच्या सभासद प्रतिनिधी म्हणून नुकतीच नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीबद्दल रयत सेवक समितीच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी बोलताना रयत सेवक समितीचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी, "रामदास शिंगाडे यांनी सभासदांचा आवाज बनून काम करावे. सभासदांच्या समस्या व अडचणी बँकेच्या प्रशासनाच्या मदतीने सोडवण्यासाठी सक्रिय भूमिका घ्यावी," अशी अपेक्षा व्यक्त केली.

सभासदांच्या समस्या सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध राहू, असे मनोगत रामदास शिंगाडे यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमास रयत सेवक समितीचे अध्यक्ष सचिन झगडे, विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ, उपप्राचार्य शहाजी एकार, पर्यवेक्षिका सुनीता काकडे तसेच विकास लोखंडे, सुधीर साबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# गणेश पाड्यातील रणरागिणी पुन्हा निवडणुकीत बाजी मारणार

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महापालिका सार्वत्रिक निवडणूकित २०१७ मध्ये शिवसेनेतून प्रचंड बहुमताने निवडून आल्यावर माजी नगरसेविका दर्शना चरणदास म्हात्रे यांनी आपल्या प्रभागात अनेक विकास कामे केली. येत्या ठाणे महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत त्या प्रभाग क्रं. २८ मधून पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या असून आपल्या प्रभागात त्याचच्या प्राचाराचा जोर वाढू लागला असून केलेल्या कामाची पोहचपावती मतदार देतील अशी ग्वाही मतदार देत आहे. पती चरणदास म्हात्रे (विभाग प्रमुख) यांचा दांडगा अनुभव पाठीशी असल्याने दर्शनाताई प्रभागातील अधिकाधिक प्रश्न मार्गी लावण्यात त्या यशस्वी झाल्या आहेत. यंदा त्यांना निवडणूकित उमेदवार म्हणून पुन्हा संधी मिळाल्याने आपल्या प्रभागातील प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी आदिसारखेच



योगदान देईल असे दर्शनाताई यांनी स्पष्ट केले आहे. प्रभाग २८ मधील पाणी टंचाई, लाईट, रस्ते, गटार यांसारख्या मूलभूत प्रश्नांना कायम स्वरूपी मार्गी लावण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहिलेल्या दर्शना म्हात्रे यांच्या प्रामाणिक प्रयत्नांना बहुतांश प्रमाणात यश आले असल्यामुळे होऊ घातलेल्या ठा.म.पा २०२५-२६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत मिळणारा मतदारांचा वाढता जनाधार हा रेकॉर्ड ब्रेक करणारा ठरत आहे. आजवर करत आलेली जनतेची सेवा निरंतर पुढे नेतील असा विश्वास मतदारांना आहे. आगामी ठाणे महापालिका निवडणुकीत दर्शना म्हात्रे पुन्हा एकदा जनतेच्या विश्वासाच्या कसोटीवर उतरल्या आहेत. हा निवडणूक लढा केवळ एका उमेदवाराचा नसून, काम करणाऱ्या नेतृत्वाला साथ देण्याचा असल्याची भावना समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे. कारण दर्शना म्हात्रे म्हणजे आश्वासनांची यादी नव्हे, तर पूर्ण झालेल्या कामांची साक्ष असल्याचे चित्र प्रभागात दिसून येत आहे.




# NovaWatch स्मार्टवॉच मालिका सादर

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

Ai+ ने आज NovaWatch सादर केले, त्याची स्मार्टवॉच लाइनअप जी सुरक्षा, दैनंदिन आरोग्य आणि वैयक्तिक शैलीमध्ये ब्रँडच्या कनेक्टेड डिव्हाइस पोर्टफोलिओचा विस्तार करते. Q1 2026 मध्ये लॉन्च होणारे, NovaWatch हे Ai+ च्या विश्वासाचे प्रतिबिंबित करते की घालण्यायोग्य तंत्रज्ञानाने फॅशन-फॉरवर्ड डिझाइनसह व्यावहारिक उपयुक्तता एकत्र केली पाहिजे. Ai+ NovaWatch लाइनअपमध्ये Active, Wearbuds, Kids Geo फेंसिंग घड्याळ आणि उद्योगात प्रथमच, फिरता कॅमेरा LTE घड्याळ यांचा समावेश आहे.

# पाडळणे ग्रामपंचायतीत 'कापडी पिशवी वापरा' उपक्रम उत्साहात संपन्न



**पाडळणे : (समर्थ गांवकरी)**

ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या सशक्त पंचायत – समृद्ध महाराष्ट्र मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना अंतर्गत पाडळणे ग्रामपंचायतीच्या वतीने 'प्लास्टिक पिशवीऐवजी कापडी पिशवी वापरा' हा जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम तालुक्याचे गटविकास अधिकारी श्री. अमरजी माने, विस्तार अधिकारी संजयजी चौरे व गहिरे साहेब,यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला. या कार्यक्रमास ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत कर्मचारी, महिलावर्ग, बचत गटाच्या महिला, स्थानिक ग्रामस्थ तसेच गावातील शाळेतील विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी पर्यावरण प्रेमी राहुल प्रभाकर राऊत (मवेशी) यांना प्रमुख मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी प्लास्टिकचा मानवी जीवनावर व पर्यावरणावर होणारा घातक परिणाम सविस्तरपणे स्पष्ट केला. प्लास्टिकमुळे होणारे प्रदूषण व आरोग्यावरील दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन करत कापडी पिशवीचा वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांना "शून्य टक्के प्लास्टिक" ही संकल्पना समजावून सांगत पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्याचा संदेश दिला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पाडळणे ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती रोहिणीताई बगाड, उपसरपंच श्री. विकासची तळेकर, सदस्य शिवाजी उगले, बुधा असवले, भाऊसाहेब मधे, शीला तळेकर, रूपाली सावंत, पेसा मोबिलायझर सौ. नंदा सुपे, पेसा अध्यक्ष श्री. चंद्रकांत शेंगाळ, मुख्याध्यापिका पडवळे मॅडम, बारामते सर, ग्रामस्थ भाऊ पाटील तळेकर, प्रथमेश तळेकर, संतोष तळेकर, सर्व अंगणवाडी सेविका, आशा सेविका, शालेय विद्यार्थी तसेच ग्रामपंचायत अधिकारी श्री. एस. एस. तळपाडे, शेलद ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी श्री. वायळ भाऊसाहेब, गिताराम तळेकर, ग्रामपंचायत कर्मचारी आकाश नवले, रामचंद्र बगाड, रवींद्र तळेकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या उपक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये प्लास्टिकमुक्त जीवनशैलीबाबत जनजागृती निर्माण झाली असून, पाडळणे ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# श्री बालाजी डायग्रोस्टिक सेंटरमध्ये अत्याधुनिक सोनोग्राफी मशीनचे उद्घाटन

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथील श्री बालाजी डायग्रोस्टिक सेंटरमध्ये अत्याधुनिक नवीन सोनोग्राफी मशीनचे उद्घाटन आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या हस्ते संपन्न झाले.



यावेळी आमदार पाचपुते बोलताना म्हणाले की, श्रीगोंदा शहराचा सर्वांगीण विकास वेगाने होत असून रस्ते, पाणी, वीज तसेच सार्वजनिक सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. वाढत्या नागरीकरणामुळे शिक्षण, आरोग्य व इतर मूलभूत सेवा विस्तारत असून आरोग्यसेवा ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे शहरातील रुग्णालयांमध्ये आधुनिक पायाभूत सुविधा व अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. भोसले दांपत्य गेल्या वीस वर्षांपासून श्रीगोंदा तालुक्यात सातत्याने आरोग्यसेवा देत असून नवनवीन संकल्पनांद्वारे सेवा विस्तार करत आहेत. गेल्या चार वर्षांपासून कार्यरत असलेल्या श्री बालाजी डायग्रोस्टिक सेंटरमध्ये सिटी स्कॅन, एक्स-रे, सोनोग्राफी, टू-डी इको तपासणी तसेच सर्व प्रकारच्या रक्ततपासणी सुविधा उपलब्ध आहेत. नव्याने सुरू करण्यात आलेल्या अत्याधुनिक सोनोग्राफी मशीनचा लाभ तालुक्यातील नागरिकांनी घ्यावा, असे आवाहनही आमदार पाचपुते यांनी केले. याप्रसंगी डॉ. विक्रम भोसले यांनी आभार व्यक्त करताना सांगितले की, हॉस्पिटलमध्ये महात्मा फुले जन आरोग्य योजना, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी तसेच सर्व प्रकारच्या कॅशलेस इन्शुरन्स सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामुळे शहर व तालुक्यातील गोरगरीब रुग्णांना अचूक, वेगवान व दर्जेदार तपासणीची सुविधा स्थानिक पातळीवरच मिळणार असून ही सुविधा आरोग्यसेवेत मोलाची भर ठरणार आहे.

कार्यक्रमप्रसंगी श्रीगोंदा मेडिकल असोसिएशनचे नूतन अध्यक्ष डॉ. मोहनराव लबडे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच डॉ. अनिल घोडके व डॉ. राजेंद्र सिदनकर यांचा वाढदिवस साजरा करून त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमास ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. अरुण रोडे, डॉ. अविनाश जामदार, डॉ. साहेबराव खेतमाळीस, डॉ. प्रमोद गायकवाड, डॉ. चव्हाण, डॉ. राज सय्यद, डॉ. राजेश पाखरे, डॉ. बाळासाहेब पवार, डॉ. विश्वास भापकर, डॉ. निलेश कपिल, डॉ. हंबीर म्हस्के, डॉ. अनुप बगाडे, डॉ. संतोष मोटे, डॉ. गणेश बारगळ, डॉ. रविराज मचे, डॉ. चौधरी, डॉ. टकले आदी मान्यवर डॉक्टर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरोग्यसेवेत सातत्याने नवे प्रयोग व आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या डॉ. भोसले दांपत्याचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# झिरो-फॉरेक्स डायमंड रिझर्व्ह क्रेडिट कार्ड लाँच!

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

आयडीएफसी फर्स्ट बँकेने आज झिरो-फॉरेक्स डायमंड रिझर्व्ह क्रेडिट कार्ड लाँच करण्याची घोषणा केली, ही प्रीमियम ट्रॅव्हल आणि लाइफस्टाइल ऑफर प्रामुख्याने श्रीमंत जागतिक प्रवाशांसाठी आहे ज्यांना झिरो फॉरेक्स मार्कअप, ट्रॅव्हल लाउंज, ॲक्सिलरेटेड ट्रॅव्हल रिवॉर्ड्स आणि लाइफस्टाइल विशेषाधिकारांचा प्रस्ताव मिळवायचा आहे.

# श्रीगोंदे येथील नागवडे विधी महाविद्यात विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन

**श्रीगोंदे तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथील नागवडे विधी महाविद्यालयात ॲड गणेश शिरसाठ यांचे विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व बौद्धिक विकासासाठी महाविद्यालयात मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड प्रसाद इंगळे होते.

याप्रसंगी शिरसाठ यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासपद्धती, संशोधनाची गोडी, उच्च शिक्षणाच्या संधी तसेच करिअरविषयक मार्गदर्शन देण्यात आले.

व्याख्यानात वक्त्यांनी विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासासोबतच संदर्भग्रंथ वाचन, लेखन कौशल्य, तसेच सखोल विचार करण्याची सवय लावावी, असे आवाहन केले.

विद्यापीठीन शिक्षणात गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी शिस्त, परिश्रम आणि जिज्ञासा महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी दिशा मिळाल्याची भावना उपस्थित विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानचे निरीक्षक एस. पी. गोलांडे , सोनिया गांधी पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य अमोल नागवडे , उपाध्यक्ष ॲड. नरेंद्र भोस, श्रीगोंदा वकील संघाचे सदस्य ॲड. अशोक रोडे, ॲड. सुनील भोस, ॲड. अशोक वाळुंज, ॲड. जयंत शिंदे, ॲड. रोहित गायकवाड, ॲड. अक्षय मखरे, ॲड. सचिन कोरडकर, तसेच सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड. गितेश सुरसे, विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड. जी. बी. नेवसे, ॲड. नितीन भिंगारदिवे, ॲड. संतोष दांगडे, प्रा. साक्षी मॅडम व वुमन कल्चरल रिप्रेझेंटेटिव्ह पूजा बेंद्रे मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या डॉ अंजुला चौबे यांनी तर सुत्र संचालन तर ॲड अक्षय फाटे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



ठाणे : ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 26 साठी प्रभाग क्रमांक 24 अ मधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अधिकृत उमेदवार सौ माधुरी संजय ठाकरे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन विटावा येथे आज श्री. अमोल मिटकरी साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. सदर दिवशी विटावा गणपती पाडा या परिसरात रॅलीचे आयोजन करण्यात आले व त्यानंतर चौक सभेचे आयोजन करण्यात आले होते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अधिकृत उमेदवार सौ माधुरी संजय ठाकरे, कुमारी प्राची रोहिदास पाटील, श्री आनंद पांडुरंग पाटील व विजय संपत पवार यांच्या प्रचारार्थ चौक सभेचे आयोजन करण्यात आले. श्री अमोल मिटकरी साहेब यांनी चारही उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आव्हान प्रभाग क्रमांक 24 मधील मतदारांना केले. (फोटो - संतोष पडवळ)

# २३ जानेवारीपासून आठवी विश्वनाथ स्पोर्ट मिट

- एमआयटी एडीटी विद्यापीठात रंगणार राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय स्पर्धेचा थरार
- ऑलिंपियन मुष्ठीयोद्धा विजेंदर सिंह यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे भव्य उद्घाटन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणे येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही आठवी विश्वनाथ स्पोर्ट मिट (व्हीएसएम–२०२६) या वर्षातील सर्वांत मोठ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन/आंतरविद्यापीठीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचा आठवा हंगाम २३ ते २८ जानेवारी २०२६ दरम्यान विद्यापीठाच्या क्रीडा




संकुलात पार पडणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ रोजी पद्मश्री, अर्जुन पुरस्कार व ऑलिंपिक कांस्यपदक विजेते मुष्ठीयोद्धा विजेंदर सिंह यांच्या हस्ते होणार आहे. हा कार्यक्रम एमआयटी शिक्षण समूहाचे संस्थापक विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून, भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई) नेताजी सुभाष राष्ट्रीय क्रीडा संस्थेचे (एनएसएनआयएस) उपमहासंचालक व वरिष्ठ कार्यकारी संचालक विनित कुमार, मेजर ध्यानचंद पुरस्कारप्राप्त बॅडमिंटनपटू तृप्ती मुरगुंडे, विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड तसेच डॉ. सुनीता कराड यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण समारंभ बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ रोजी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात होणार आहे. या समारंभात पद्मश्री व अर्जुन पुरस्कारप्राप्त तसेच रोईंगमध्ये आशियाई सुवर्णपदक विजेते कॅप्टन बजरंग लाल ताखर (व्हीएसएम) यांच्या हस्ते बक्षीस वितरण होणार असून, ऑलिंपियन व अर्जुन पुरस्कार विजेते जलतरणपटू विरधवल खाडे तसेच मेजर ध्यानचंद पुरस्कारप्राप्त रोवर स्मिता शिरोळे-यादव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या प्रेरणेतून व प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या पुढाकाराने देशातील विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती रुजावी तसेच विविध क्रीडाप्रकारांतून प्रतिभावान खेळाडू घडावेत, या उद्देशाने विश्वनाथ स्पोर्ट मिटची सुरुवात करण्यात आली.

या स्पर्धेच्या माध्यमातून सक्षम क्रीडा व्यासपीठ उपलब्ध करून देत राज्यासह देशाच्या क्रीडा संस्कृतीत मोलाची भर घालणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या स्पर्धेत क्रिकेट, फुटबॉल, बॅडमिंटन, बास्केटबॉल, व्हॉलिबॉल, कबड्डी, टेनिस, टेबल-टेनिस, खो-खो, वॉटर पोलो, चेस, जलतरण, इनडोअर रोईंग, बॉक्सिंग, तिरंदाजी या खेळांमध्ये सहभागी क्रीडापटूंमध्ये विजयासाठी चुरस पाहायला मिळणार आहे.

एमआयटी एडीटी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणे येथील १५०+ एकरांच्या प्रशस्त व अत्याधुनिक क्रीडा सुविधांनी सुसज्ज कॅम्पसमध्ये 'खेळाच्या माध्यमातून राष्ट्र उभारणी' या ब्रीदवाक्यासह आयोजित व्हीएसएम–८ मध्ये आतापर्यंत १३५ हून अधिक शैक्षणिक संस्था/विद्यापीठांमधील ५ हजारांहून अधिक खेळाडूंनी १५ क्रीडा प्रकारांसाठी नावनोंदणी केली आहे. स्पर्धेच्या कालावधीत पाच दिवसांत १० हजारांहून अधिक खेळाडू व प्रशिक्षकांचा विद्यापीठ परिसरात वावर राहणार आहे.

यंदा विश्वनाथ स्पोर्ट मिटच्या आठव्या हंगामात १५ क्रीडा प्रकारांमध्ये १३५ हून अधिक शिक्षण संस्थांमधील ५ हजारांहून अधिक खेळाडू आपली प्रतिभा सादर करणार आहेत. डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी क्रीडा अकादमीतील विद्यार्थी व शिक्षकांनी स्पर्धेच्या तयारीत पुढाकार घेतल्याने या सहा दिवसांत विद्यापीठाचे संपूर्ण वातावरण क्रीडामय होणार आहे.

**— प्रा. डॉ. मंगेश कराड, कार्यकारी अध्यक्ष व प्र-कुलपती, एमआयटी एडीटी विद्यापीठ, पुणे.**

# विज्ञान प्रदर्शनासाठी १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार - ना. विखे पाटील

## जिल्हास्तरीय ५३ वे बाल वैज्ञानिक प्रदर्शन पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात संपन्न

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

विज्ञान प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यामध्ये संशोधनात्मक वृती निर्माण करण्यासाठी शालेय स्तरावर अधिक प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. विज्ञान प्रदर्शनासाठी अधिकच्या सोयी सुविधा निर्माण करून देतानाच एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याची घोषणा जलसंपदा तथा पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.

जामखेड येथील नागेश विद्यालय येथे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग व जिल्हा विज्ञान-गणित अध्यापक संघ, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ वे जिल्हास्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शन २०२५-२६ चा पारितोषिक वितरण समारंभ मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रमास जिल्हा बँकेचे संचालक अंबादास पिसाळ नितीन दिनकर मनोज कुलकर्णी विनायक देशमुख शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संध्या गायकवाड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर, गटविकास अधिकारी प्रदीप चव्हाण, नागेश विद्यालयाचे प्राचार्य भगवान मडके यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले , विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही.घोकमपट्टीच्या शिक्षणाचे दिवस आता संपले आहेत. विद्यार्थ्यांनी प्रयोग, संशोधन व निरीक्षणावर भर दिला पाहिजे.यासाठी शिक्षकांच्या मानसिकतेत सुध्दा बदल होण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आपल्या देशाला डॉ सी.व्ही. रमन डॉ होमी भाभा डॉ.एपीजे अब्दुल कलाम डॉ एम.एस. स्वामीनाथन् यांच्या सारख्या थोर शास्त्रज्ञांची परंपरा लाभली. प्रत्येकाने आपल्या योगदानातून देशाला बलशाली बनविण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले आहेत. यासर्व थोर शास्त्रज्ञांचा इतिहास विद्यार्थ्यांच्या पर्यत पोहचविण्यात यंत्रणा कमी पडत असल्याची खंत डॉ विखे पाटील यांनी व्यक्त केली.

आज जगभरात भारतीय शास्त्रज्ञ आपली क्षमता सिद्ध करत आहेत.ब्रम्होस चांद्रयान मोहीम यामाध्यमातून तसेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरद्दष्टीतून आत्मनिर्भर भारताकडे देशाची वाटचाल सुरू आहे. देशात तसेच जगभरात तंत्रज्ञानात होत असलेले बदल व नवनवीन संशोधनाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी इस्रो, नासा यांसारख्या वैज्ञानिक संस्थांना विद्यार्थ्यांच्या सहलीचे आयोजन करण्याची सूचना त्यांनी शिक्षण विभागाला केली.

ते पुढे म्हणाले, संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. आजच्या घडीला प्रत्येक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होताना दिसत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर विविध क्षेत्रांमध्ये वेगाने वाढत आहे. देश कौशल्य विकास कार्यक्रमात उभारी घेत असून, उद्योगांच्या मागणीनुसार अभ्यासक्रम तयार करण्यात येत आहेत. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमातून कौशल्याधारित कोर्सेस सुरू करण्यात यावेत. कालानुरूप शैक्षणिक अभ्यासक्रमातील बदलते प्रवाह यासारख्या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात यावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



आजच्या आधुनिक व तंत्रज्ञानाच्या बदलत्या युगात अशा जिल्हास्तरीय प्रदर्शनांमधून भावी गुणवंत वैज्ञानिक घडावेत, यासाठी आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. प्रदर्शन आयोजनासाठी असलेल्या ५ लाख रुपयांच्या निधीत वाढ करून तो १ कोटी रुपयांपर्यंत करण्यात येईल. या माध्यमातून जिल्ह्यातून भविष्यात मोठे शास्त्रज्ञ व संशोधक घडतील, असा विश्वास व्यक्त करून त्यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संध्या गायकवाड म्हणाल्या की, विद्यार्थ्यांमध्ये गणित व विज्ञान विषयांबाबत आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या तीन महिन्यांपासून प्रत्येक तालुक्यात बाल वैज्ञानिक प्रदर्शनांचे आयोजन करण्यात आले असून, त्यामधून उत्कृष्ट ठरलेली उपकरणे जिल्हास्तरीय प्रदर्शनात सादर करण्यात आली आहेत. मूल्यांकनानंतर उत्कृष्ट ठरलेल्या २९ उपकरणांचा राज्यस्तरीय प्रदर्शनात समावेश करण्यात येणार आहे.

या बाल वैज्ञानिक प्रदर्शनात जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील शाळांमधील विद्यार्थ्यांनी विज्ञान, गणित, पर्यावरण, आरोग्य, शेती, ऊर्जा, पाणी व्यवस्थापन, डिजिटल तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) या विषयांवर आधारित नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे, संशोधन वृत्तीचे व सामाजिक जाणिवेचे दर्शन घडविणाऱ्या या प्रकल्पांचे मान्यवरांनी कौतुक केले.

कार्यक्रमात विविध गटांतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे, सन्मानचिन्हे व पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमास जिल्हा विज्ञान-गणित अध्यापक संघाचे पदाधिकारी, अधिकारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# "शेकडो दारं, अनेक सदस्य... आणि एकच बॉस!" बिग बॉस मराठी परततोय !



**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मराठी मनोरंजनाची ओळख बनलेला, ज्याची वाट अख्खा महाराष्ट्र डोळे लावून पाहतो असा मराठी टेलिव्हिजनवरील सर्वात भव्य आणि चर्चेत असलेला रिॲलिटी शो 'BIGG BOSS मराठी' पुन्हा एकदा नव्या पर्वासह प्रेक्षकांच्या भेटीला येतो आहे. देशाचा लाडका सुपरस्टार, आपले लाडके 'भाऊ' रितेश देशमुख बिग बॉस मराठीचा नवा सीझन घेऊन येत आहेत. "बिग बॉस सांगू इच्छितात, बिग बॉस आदेश देत आहेत..." हा दमदार आवाज पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या घराघरांत घुमणार आहे. यंदा 'बिग बॉस मराठी' चं घर नव्या रूपात, नव्या रचनेत आणि नव्या खेळाच्या नियमांसह सादर होत असून, "दार उघडणार... नशिबाचा गेम पालटणार!" या रोमांचक थीमसह नव्या सदस्यांच्या स्वागतासाठी ते पूर्णपणे तयार आहे. १०० हून अधिक कॅमेऱ्यांच्या नजरकैदेत, तब्बल १०० दिवस चालणाऱ्या या प्रवासात अतरंगी स्वभावांचे बहुरंग, नात्यांचे बदलते पदर, प्रेम-मैत्री, मतभेद, भांडणं आणि चुरशीचा खेळ प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. बिग बॉसच्या घरातील सदस्य आणि प्रेक्षक यांच्यातील दुवा म्हणजे कार्यक्रमाचे सूत्रसंचालक. मागील पर्वात आपल्या ठाम मतांमुळे, रोखठोक भूमिका, पण तितक्याच प्रेमळ स्वभावाने, साध्या-सहज व्यक्तिमत्त्वाने आणि गरज पडल्यास कडक शिस्तीच्या भूमिकेतून प्रेक्षकांची मने जिंकणारे, हिंदी-मराठी मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय सुपरस्टार रितेश देशमुख याही पर्वात सूत्रसंचालकाची महत्त्वाची जबाबदारी सांभाळत आहेत. मागील सीझनमध्ये त्यांनी कधी मित्र, कधी मार्गदर्शक बनून सदस्यांना आरसा दाखवला, परखड मत व्यक्त केली आणि खोटेपणाचे मुखवटे उतरवले.



# कार्यक्रमाचे पुण्यामध्ये आयोजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

शहरामध्ये दि. १० व ११ जानेवारी २०२६ रोजी अनंत विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचा समस्या व मार्गदर्शन सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रम हा जय गणेश लॉन्स, नवीन देहू-आळंदी रोड, भारत माता चौक, मोशी, पुणे या ठिकाणी होणार आहे. दि. १० व ११ रोजी सकाळी ठिक ९ वाजता रामानंदाचार्यांचे संतपीठावर आगमण झाल्यानंतर सुरुवातीला आरती होईल व त्यानंतर लगेच रामानंदाचार्यांच्या अमृतरूपी प्रवचनाला सुरुवात होणार आहे.

# विविध विकास प्रकल्पांना भाऊ कदम आणि नीलम खताळ यांची भेट

## मुख्यमंत्री पंचायतराज अभियानाची जनजागृती करत साधला संवाद

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

संगमनेर तालुक्यातील कासारा दुमाला गावामध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांच्यातर्गत राब विण्यात आलेल्या विविध प्रकल्पांची पाहणी करण्यासाठी मराठी सिनेसृष्टी तील अभिनेते भाऊ कदम यांनी भेट दिली. यावेळी अभिनेते भाऊ कदम आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी निलम खताळ यांच्यासह सरपंच उपसरपंच सदस्य ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करून ग्रामस्थांशी संवाद साधला

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची प्रभावी अंमलबजावणी व ग्रामीण भागात जनजागृती करण्या साठी अहिल्यानगर जिल्हापरिषदेच्या वतीने मराठी सिनेअभिनेते भाऊ कदम यांची निवड करण्यात आली आहे. या अनुषंगाने त्यांनी संगमनेर



तालुक्यातील कासारा दुमाला गावाला भेट दिली.या वेळी त्यांनी गावातील जनार्दन जाधव यांचा मोहगणी वृक्ष लागवड प्रकल्प, तुळशीराम सातपुते यांचा गाय गोठा प्रकल्प, मीराबाई अभंग यांचा घरकुल प्रकल्प, रुक्मिणी महिला बचत गट व्यवसाय प्रकल्प तसेच घनश्याम गुंजाळ यांचा लिंबू लागवड प्रकल्प स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सुरू असलेल्या ग्रामपंचायत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प,फिल्टर पाणी योजना, स्मशानभूमी व नदी घाट परिसर अशा विविध प्रकल्पाची पाहणी करत संवाद साधला.

गावातील बाबाजी समाधी मंदिर परिसरात स्वच्छता मोहिमे व श्रमदान करण्यात आले या श्रमदानात स्वतः अभिनेते भाऊ कदम, सौ नीलम खताळ, सरपंच राजेंद्र त्रिभुवन, शिवसेना उपजिल्हा प्रमुख रमेश काळे यांच्यासह ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला .त्यानंतर अभिनेते भाऊ कदम यांनी जिल्हा परिषद शाळा व काशेश्वर माध्यमिक विद्यालयास भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला त्या नंतर ग्रामपंचायत कार्यालयासमोर ग्रामस्थांशी संवाद साधून मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हे गावाच्या सर्वांगीण विकासा साठी कसे उपयुक्त आहे, याची सविस्तर माहिती दिली.

# काष्टीतील तरुणांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक

■ सुमारे पाच लाखांचा सापडलेला ऐवज पत्ता शोधून केला परत

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी–अजनुज रस्त्यावर रस्त्यावर पडलेला सुमारे पाच लाख रुपये किमतीचा मौल्यवान ऐवज गावातील दोन तरुणांनी प्रामाणिकपणाने मूळ मालकाचा पत्ता शोधून त्यांच्याकडे सन्मानाने परत केल्याची घटना घडली आहे. या उल्लेखनीय कृतीमुळे अवधूत सोमनाथ पानसरे व महादेव चंद्रकांत खटावकर या तरुणांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



दि. ८ रोजी काष्टी (गवतेवस्ती) येथील रहिवासी अवधूत पानसरे व महादेव खटावकर हे रात्री सुमारे आठ वाजता जनावरांच्या खुराकासाठी काष्टीकडे जात असताना भास्करराव जगताप यांच्या वस्तीजवळ रस्त्यावर पडलेली एक बॅग त्यांच्या निदर्शनास आली. त्यांनी तात्काळ गाडी थांबवून ती बॅग सुरक्षितरीत्या घेतली. आवश्यक खुराक घेऊन घरी परतल्यानंतर ही बॅग त्यांनी आपले वडील सोमनाथ पानसरे यांच्याकडे सुपूर्द केली.

बॅग उघडून पाहिल्यानंतर त्यामध्ये मौल्यवान सोन्याचे दागिने, रोख रक्कम तसेच आधारकार्ड, पॅनकार्डसह विविध महत्त्वाची कागदपत्रे आढळून आली. दरम्यान, बॅग हरवलेली असल्याचे लक्षात येताच तिचे मालक सचिन वाल्मिक राऊत हे भर अंधारात काष्टी–अजनुज रस्त्यावर बॅग शोधत व्याकुळ अवस्थेत चौकशी करत होते. सापडलेल्या आधारकार्डच्या मदतीने पानसरे कुटुंबीयांनी पेडगाव येथील रहिवासी सचिन वाल्मिक राऊत व त्यांची पत्नी साक्षी राऊत यांच्याशी संपर्क साधून बॅग सापडल्याची माहिती दिली. ही माहिती मिळताच राऊत दाम्पत्याला मोठा दिलासा मिळाला. शुक्रवार दि. ९ रोजी सकाळी अकरा वाजता पानसरे यांच्या निवासस्थानी येऊन सर्व खात्री करून अवधूत पानसरे व महादेव खटावकर यांनी सदर बॅग प्रामाणिकपणे राऊत कुटुंबियांच्या स्वाधीन केली.

यावेळी सचिन राऊत यांनी सांगितले की, पुण्याहून काष्टी मार्गे मूळगावी पेडगावकडे जात असताना काष्टी–अजनुज रस्त्याच्या खराब स्थितीमुळे गाडीला बांधलेली बॅग कधी पडली हे लक्षातच आले नाही. घरी पोहोचल्यानंतर बॅग नसल्याचे समजताच मोठा धक्का बसला. मात्र या तरुणांच्या प्रामाणिकपणामुळे सर्व मौल्यवान ऐवज सुरक्षित परत मिळाल्याने त्यांनी मनापासून आभार मानले. यावेळी साक्षी राऊत यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. या घटनेची माहिती गावात पसरताच अवधूत पानसरे व महादेव खटावकर यांच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# संस्कार शिबीराचे आयोजन

**राजूर: (समर्थ गांवकरी)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ॲड् . मनोहरराव नानासाहेब देशमुख महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग राजूर यांच्या संयुक्त विद्यमाने " शाश्वत विकासासाठी युवक : पाणलोट आणि पडीक जमीन व्यवस्थापन " या विषयावर सोमवार दिनांक १२ ते १८ जानेवारी २०२६ या कालावधीत मवेशी ता.अकोले,जि. अहिल्यानगर येथे विशेष हिवाळी श्रम शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरासाठी रा. से.यो.चे १५० स्वयंसेवक सहभागी होणार आहेत अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ भाऊसाहेब देशमुख यांनी दिली आहे. या शिबिराचे उद्घाटन दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता मा.आ. डॉ.किरणजी लहामटे यांचे हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी सत्यनिकेतन संस्थेचे सचिव मा.एम. एल. मुठे हे उपस्थित राहणार आहेत.


# काँग्रेसमध्ये उपेक्षा तर शिवसेनेने हेरला गडी

■ अखेर ... गुरुजी झाले नगरसेवक!

**बुलढाणा : (समर्थ गांवकरी)**

बुलढाणा शहराचा वैचारिक चेहरा म्हणून कार्यरत प्रा. सुनील सपकाळ यांना नगरपालिकेत स्वीकृत सदस्य म्हणून स्थान देण्यात आले आहे. त्यांच्या निवडीमुळे वैचारिक जडणघडण असलेला नेता आता नगरपालिका सभागृहात असणार आहे. काँग्रेसमध्ये असताना प्रचंड क्षमता असूनही ते उपेक्षित राहिले.मात्र त्यांच्यातील नेतृत्व गुण हेरून आ.संजय गायकवाड यांनी शिवसेनेतर्फे त्यांना स्वीकृत नगरसेवक पदाची संधी दिली आहे. त्यांच्या निवडीने बुलढाणा मध्ये अनेक घटकांमध्ये आनंद व्यक्त केला गेला. पार पडलेल्या नगरपालिका निवडणुकीमध्ये सुनील सपकाळ यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षा तर्फे नगरसेवक पदाची निवडणूक लढवली. यापूर्वी ते काँग्रेसमध्ये





जिल्हा सरचिटणीस पदावर कार्यरत होते.काँग्रेसमध्ये असताना जवळजवळ सर्वच उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग महत्वपूर्ण असायचा. निवडणुकीच्या वेळी काँग्रेसकडून तिकीट मिळणार नाही हे जवळपास निश्चित झाल्याने त्यांनी उबाठा शिवसेनेमध्ये प्रवेश केला होता. तर नुकताच त्यांनी शिंदे सेनेत प्रवेश करून राजकीय खळबळ उडून गेली होती. जेव्हा ते शिंदे सेनेत गेले तेव्हाच पुढे राजकीय समीकरणे नक्कीच बदलणार असे मानले जात होते. त्यानुसार आज स्वीकृत नगरसेवक पदासाठी त्यांचे नाव आल्याने बुलढाण्याच्या राजकारणात अनेकांना अनपेक्षित धक्का बसला आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी काम केले, सामाजिक क्षेत्रात गेल्या 25 वर्षापासून ते कार्यरत आहे. दीर्घकाळ कार्य करूनही नगरसेवक पदाने त्यांना हुलकावणी दिली होती. परंतु त्यांच्यातील उर्मी त्यांना स्वस्त बसू देत नव्हती. हा गडी धर्मवीर आ. गायकवाड यांनी हेरला. विश्वास दर्शवीत त्यांना स्वीकृत नगरसेवक पदी स्थान दिले आहे. एक प्रकारे हिरा पारखण्याचे काम त्यांनी केले.बौद्धिक क्षमता असणारा नगरसेवक म्हणून सुनील सपकाळ नगरपालिकेमध्ये असने बुलढाणा शहराच्या सामाजिक जडणघडणीमध्ये महत्त्वाचे ठरणार आहे.

# उमेदवार डॉ. गाथा विकास इंगळे यांना मतदारांचा भक्कम पाठिंबा




**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महापालिका निवडणुकीत दिवा प्रभाग क्र २७ मध्ये वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. गाथा विकास इंगळे यांच्या प्रचाराला सर्व समाजघटकांकडून मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विशेषतः कोकणी, उत्तर भारतीय समाज तसेच बहुजन समाज यांचा ठाम आणि सक्रिय पाठिंबा मिळत असल्याचे चित्र प्रभागात दिसून येत आहे. प्रचारादरम्यान नागरिकांशी थेट संवाद साधताना स्थानिक प्रश्न, मूलभूत सुविधा, रोजगार, शिक्षण, आरोग्य, महिलांची सुरक्षितता आणि स्वच्छ प्रशासन याबाबत मांडलेली भूमिका सर्व समाजघटकांना एकत्र आणणारी ठरत आहे. त्यामुळे प्रभागातील विविध भाषा, संस्कृती आणि समाजांचे नागरिक मोठ्या विश्वासाने वंचित बहुजन आघाडीच्या पाठीशी उभे राहत आहेत. "सत्ता नव्हे – समाज परिवर्तन!" या विचारधारेखाली सर्वांना सोबत घेऊन विकासाचा समान मार्ग तयार करण्याचा संदेश गाथा विकास इंगळे देत असून, त्याला कोकणी, उत्तरभारतीय आणि बहुजन समाजाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

# वॉर्ड क्र. ३४ मधील पाणी, वाहतूक आणि आरोग्य समस्या सोडवण्यास शिवसेना कटिबद्ध

**पुणे, प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी प्रचाराचा जोर वाढला असून प्रभाग क्रमांक ३४ नऱ्हे-वडगाव बु.-धायरीमध्ये शिवसेनेच्या उमेदवारांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसते. या प्रभागात नव्याने महापालिकेत समाविष्ट गावांचा समावेश असून नऱ्हे-वडगाव बु.-धायरीमध्ये पाणी, वाहतूक आणि आरोग्य समस्या सोडवण्यास शिवसेना कटिबद्ध असल्याची ग्वाही शिवसेना उमेदवारांनी मतदारांना दिली.




प्रभाग क्रमांक ३४ नऱ्हे-वडगाव बु. - धायरीमध्ये शिवसेनेच्या वतीने गिरमे निलेश दशरथ, गिरमे राधिका दशरथ, सुप्रिया ईश्वर भूमकर आणि युवा पत्रकार तांबे विठ्ठल ज्ञानेश्वर निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

समाविष्ट गावे पहिल्यांदाच महापालिका निवडणुकीला सामोरे जात आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नेहमी सामान्य लोकांच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे शिवसेनेच्या उमेदवारांना या गावांच्या विकासासाठी महापालिकेत पाठवणे गरजेचे आहे. नगर विकास खात्यासह महत्त्वाची खाती शिवसेनेकडे असल्याने शहराच्या विकासाला गती मिळेल.

नऱ्हे गावातील पाण्याच्या पाईपलाइनसाठी शिवसेना नेत्या डॉ. निलम गोऱ्हे यांनी निधी दिला होता, त्यामुळे या भागाला पिण्याचे पाणी उपलब्ध झाले. आता फिल्टरची मागणी आहे, ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू. समाविष्ट गावांच्या करमाफीचा मुद्दा मांडला आहे, मात्र प्रशासकामुळे दुर्लक्ष झाले आहे. नवे पोलीस स्टेशन शिनसेना नेते, गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यामुळे सुरू झाले आहे. दिवसेंदिवस पुण्याला पाण्याची समस्या भीषण होत चालली आहे, त्यामुळे शेतीसाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी स्वतंत्र धरणे बांधणे गरजेचे आहे. ही मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करणार असल्याचे नुकतेच डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले आहे.

दरम्यान, या परिसरात लायगुडे दवाखाना वगळता महापालिकेच्या आरोग्य सुविधा नाहीत. यामुळे या प्रभागात महापालिकेच्या उत्तम आरोदय सेवा देण्यात येतील, तसेच वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अतिक्रमाणे हटवून रस्ते रुंदीकरणास प्राधान्य देणार असे शिवसेनेच्या उमेदवारांनी सांगितले. यामुळे या परिसराचा विकास शिवसेनाच करू शकेल असा विश्वास नीलेश गिरमे, राधिका गिरमे, सुप्रिया भूमकर आणि विठ्ठल तांबे यांनी मतदारांना दिला आहे.

# ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेच्या अध्यक्षपदी अनिल नरवाडे यांची निवड

**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**



बिलोली तालुका ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेची नुतन कार्यकारणी निवड पंचायत समितीच्या सभागृहात ज्येष्ठ पत्रकार तथा समाजिक कार्यकर्ते राजू पाटील शिंपाळकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या आयोजीत बैठकीत तालुका कार्यकारणीची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

नुकतच केंद्र सरकारने मनरेगा योजनेच्या नाम परीवर्तनात बद्दल करुन जी राम जी असे नामकरण करण्यात आलेल्या या योजने अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून वैयक्तिक लाभासह वेगवेगळी शासकीय कामे तसेच शासन निर्णयाची वेळोवेळी दिलेल्या कामात ग्रामपंचायत स्तरावर जबाबदारीने महत्वाची भुमिका निभावणारे तालुक्यातील ७३ ग्रामपंचात कार्यालयात कार्यरत ग्रामरोजगार सहाय्यकांची नुतन बिलोली तालुका कार्यकारणीच्या निवडीची पंचायत समितीच्या सभगृहात दि. ८ जानेवारी रोजी जेष्ठ पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते राजु पाटील शिंपाळकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आयोजीत बैठकीत ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेची नुतन तालुका कार्यकारणी निवड खेळीमेळीच्या वातावरणात बिनविरोध पार पडली आसुन यात तालुका अध्यक्षपदी अनिल पाटील नरवाडे गुजरीकर यांची तर कार्याध्यक्ष पदी बालाजी नरहरे, उपाध्यक्षपदी गणेश गिरगावकर व गंगाधर डोंगरे याची तर सचिव पदी ईसाक सय्यद सहसचिव पदी परमेश्वर वाघमारे कोषाध्यक्ष शिलानंद बुद्धेवाड संघटक अविनाश किनाळकर यांची बिनविरोध निवडीची घोषणा करण्यात आली. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना प. स.सहाय्यक कार्यक्रम अधिकारी साहेबराव सोंडारे,राम प्रसाद मोगल, अतिक साहेब, कुरे साहेब, जाधव साहेब आदी अधिकारी कर्मचा- यांसह विविध क्षेत्रातील आनेकानी शुभेच्छा दिल्या. तर सदर बैठकीस देवराव शिंदे, यादव वाघमारे,रवि जाधव, ज्योतीबा गायकवाड, गोविंद जाधव,यादव कुडके, निळकंठ क्यादमपुरे,विजय पवार , सुर्यकांत देशमुख,आनंदा पतंगे, विजय कदम,हाणमंत बळके,विठ्ठल एकंबे बोळेगाव ,दिलिप देवकरे भोसी,भगवान मोरे कोळगाव,गंगाधर गायकवाड,जयदिप गावंडे आजनी, सर्यनर बिजुर, किसन कांबळे बावलगाव,सुरेश शिंदे हारनाळी,सुरेश कांबळे,बळीराम शेळके कुंभरगाव,साईनाथ सुर्यवंशी यांच्यासह तालुक्यातील मोठ्या संख्येनी ग्रामरोजगार सहाय्यक उपस्थित होते.



ठाणे : ठाणे महानगर पालिकेच्या माजी महापौर मिनाक्षी शिंदे यांनी आगरी समाजाबद्दल केलेल्या बेताल वक्त्यावर दिव्यातील ठाकरे शिवसेनेकडून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख व दिवा प्रभागातील उमेदवार अँड. रोहिदास मुंडे, सचिन पाटील, ज्योती पाटील आणि योगेश निकम, नीलम पाटील यांनी पत्रकार परिषदेत निषेध व्यक्त केला आहे. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### श्री साईबाबा संस्थानला १ कोटी २ लाख रुपयांची देणगी!

शिर्डी (स. गांवकरी) : श्री साईबाबांवर देश-विदेशातील लाखो भाविकांची अढळ श्रद्धा असून भाविकांकडून सातत्याने श्री साईबाबांच्या चरणी भरभरून दान अर्पण केले जाते. मुंबई येथील Asian Paintsचे प्रवर्तक रुपेन चौकसी यांनी आज श्री साईबाबा संस्थानला १ कोटी २ लाख रुपये इतकी देणगी डिमांड ड्राफ्टद्वारे अर्पण केली. ही देणगी श्री साईबाबा संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. त्यानंतर श्री. चौकसी यांनी श्री साईबाबा समाधी मंदिर येथे श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे यांनी श्री. रुपेन चौकसी यांचा सत्कार केला.

### देवठाण-बोटा थांब्यासह नाशिक-पुणे रेल्वे मार्गाचा १ फेब्रुवारी पूर्वी निर्णय घ्या




अकोले (स. गांवकरी) : नाशिक पुणे हायस्पीड रेल्वे अकोल्यातून जावी या मागणीसाठी देवठाण येथे आज सर्वपक्षीय मागणी निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. हजारो विद्यार्थ्यांनी गावातून रॅली काढून मुख्यमंत्र्यांना आपल्या मागणीचे पत्र पाठवत या मेळाव्याची सुरुवात झाली. रेल्वे आमच्या हक्काची, आमच्या उज्वल भविष्याची या मागणीने यावेळी सबंध देवठाण पंचक्रोशी दुमदुमून गेली होती. देवेंद्र मामा रेल्वे द्या, विखे मामा रेल्वे द्या, किरण मामा रेल्वे द्या, असा आग्रह करणाऱ्या घोषणा यावेळी विद्यार्थ्यांनी दिल्या. भव्य मंडप व प्रशस्त व्यवस्थेच्या वातावरणामध्ये ही ऐतिहासिक परिषद देवठाण येथे संपन्न झाली. देवठाण येथे जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी नुकतीच एक सभा घेऊन नाशिक पुणे रेल्वे पूर्वीच्या मार्गानेच होईल व देवठाण येथे स्टेशन देऊनच रेल्वे पुढे जाईल असे आश्वासन दिले होते. एक फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थसंकल्प मांडला जातो. अर्थसंकल्पात याबाबत बदललेला रूट पुनरस्थापित करण्याची घोषणा झाली नाही तर पालकमंत्र्यांच्या या घोषणेला अर्थ राहणार नाही. पालकमंत्र्यांचे आश्वासन खरे ठरावे यासाठी त्यांनी युद्ध पातळीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांची भेट घ्यावी तसेच केंद्रीय रेल्वेमंत्री यांना भेटून एक फेब्रुवारी पूर्वी याबाबतचा निर्णय करावा. अर्थसंकल्प मांडताना तशी घोषणा दिल्ली मधून होईल यासाठी पूर्ण प्रयत्न करावेत. तसे झाले तरच पालकमंत्र्यांच्या आश्वासनाला अर्थ राहणार आहे. असे झाले नाही तर एक फेब्रुवारी नंतर वर्षभर पुन्हा या मागणीसाठी थांबावे लागेल व एक प्रकारे निवडणुकीसाठी दिलेले हे आश्वासन ठरेल. असे होऊ नये यासाठी पालकमंत्र्यांनी युद्ध पातळीवर काम करून दिलेले आश्वासन पाळावे अशी मागणी यावेळी करण्यात आली.

### प्रदर्शन विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता, संशोधन वृत्तीला दिशा देणारे व्यासपीठ



अहिल्यानगर (स. गांवकरी) : बाल वैज्ञानिक प्रदर्शन हे विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्ता व संशोधन वृत्तीला दिशा देणारे प्रभावी व्यासपीठ आहे. आजचा विद्यार्थी हा उद्याचा शास्त्रज्ञ, संशोधक, अभियंता व राष्ट्रनिर्माता आहे. त्यामुळे देशपातळीवर होत असलेल्या नवनवीन संशोधनाची माहिती विद्यार्थ्यांना देणे आवश्यक असून, त्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. जामखेड येथील नागेश विद्यालय येथे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग व जिल्हा विज्ञान-गणित अध्यापक संघ, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ वे जिल्हास्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शन २०२५-२६ चा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संध्या गायकवाड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर, गटविकास अधिकारी प्रदीप चव्हाण, नागेश विद्यालयाचे प्राचार्य भगवान मडके यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले , विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही. विद्यार्थ्यांनी प्रयोग, संशोधन व निरीक्षणावर भर दिला पाहिजे. आज जगभरात भारतीय शास्त्रज्ञ आपली क्षमता सिद्ध करत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून आत्मनिर्भर भारताकडे देशाची वाटचाल सुरू आहे. देशात तसेच जगभरात तंत्रज्ञानात होत असलेले बदल व नवनवीन संशोधनाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी इस्रो, नासा यांसारख्या वैज्ञानिक संस्थांना विद्यार्थ्यांच्या सहलीचे आयोजन करण्यात यावे.

# म्हाळुंगी पुलाच्या बांधकामासाठी ६ कोटींचा निधी मंजूर

**आमदार अमोल खताळ यांनी दिली माहिती**

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**



म्हाळुंगी नदीवर वेल्हाळे गावठाण ते राजापूर रस्ता ते निमगाव भोजापूर रस्ता, गणपती मळ्याजवळ जोडणारा पूल बांधण्याच्या कामासाठी नाबार्ड ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी योजनेंतर्गत संगमनेरला ६ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली.

यासंदर्भात माहिती देताना आमदार खताळ म्हणाले, संगमनेर तालुक्याच्या ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था अधिक सुलभ, सुरक्षित आणि दर्जेदार व्हावी यासाठी गेल्या वर्षभरापासून प्रयत्न करत आहे. शासनस्तरावरून तालुक्यातील अनेक प्रलंबित रस्त्यांच्या कामांना कोट्यवधींचा विकास निधी मंजूर करून आणण्यात यश मिळाले आहे. आता वेल्हाळे-राजापूर-निमगाव भोजापूर परिसरातील नागरिकांची मागणी लक्षात घेता, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पुलाच्या बांधकामासाठी ६ कोटी रुपयांचा निधी नव्याने मंजूर करण्यात आला आहे.

अनेक वर्षांपासून प्रलंबित ठेवण्यात आलेल्या या पुलाच्या होणाऱ्या कामामुळे घुलेवाडी आणि धांदरफळ गटातील वेल्हाळे - राजापूर - निमगाव भोजापूर - गुंजाळवाडी - चिकणी या पंचक्रोशीतील नागरिकांचा प्रवास सुलभ होऊन मोठा फायदा होणार आहे. शासनाच्या विविध विभाग आणि योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या कानाकोपऱ्यापर्यंत विकासकामे पोहोचवण्याचा संकल्प घेऊन काम करत आहे. वेल्हाळे-राजापूर-निमगाव भोजापूर परिसरातील शेतकरी, शाळकरी मुले, ग्रामस्थ आणि प्रवाशांची गैरसोय लक्षात येताच; यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सातत्याने पाठपुरावा व पत्रव्यवहार केला. त्यानुसार निधी मंजूर करण्यात आला असून लवकर पुलाचे काम सुरू केले जाणार असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली.

# वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**मांडा-टिटवाळा : (समर्थ गांवकरी)**



श्री बाळेश्वर विद्या प्रसारक मंडळ संचालित जानकी विद्यालय, मांडा-टिटवाळा (प.) येथे पूर्व-प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक (मराठी व सेमी इंग्रजी माध्यम) विभागांचे वार्षिक स्नेहसंमेलन २०२५-२६ मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडले. कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व 'दैनिक समर्थ गांवकरी'चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून स्नेहसंमेलनाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच संस्कार, शिस्त व सामाजिक भान जपावे, असे आवाहन केले. पत्रकार समाजाचा आरसा असतो. समाजहितासाठी निर्भीडपणे काम करणारी पिढी घडवणे हीच

■ डॉ विश्वासराव आरोटे यांची विशेष उपस्थिती!

खरी राष्ट्रसेवा असल्याचे त्यांनी नमूद केले. मार्च २०२५ मध्ये झालेल्या एस.एस.सी. परीक्षेत शालेय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. प्रथम: कु. भक्ती प्रदीप पवार - ८६% द्वितीय: कु. वेदांत अनंता पाटील - ८४% तृतीय: कु. ईश्वरी दादाजी जगताप - ८४% या गुणवंत विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन केले.

# पोलिसांच्या सतरा सेवा 'ऑनलाईन'; 'आपले सरकार' पोर्टलवर सुविधा

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**




शासनाच्या आपले सरकार या पोर्टलवर पोलीस दलाशी संबंधीत असणारे दाखले अथवा अनेक तक्रारी आता ऑनलाईन सेवेद्वारे मिळणार असल्याने आता स्थानिक पोलीस स्टेशनच्या हद्दीत असणाऱ्या अनेक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे आता पोलीस स्टेशनचे उंबरठे झिजवण्याची गरज आता नागरिकांना पडणार नसल्याने ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी. अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यासह पडघा पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक जितेंद्र ठाकूर तसेच पडघा पोलिस स्टेशनच्या वतीने नागरिकांना या सरकारी पोर्टलचा लाभ घेण्याचे आव्हान केले आहे. शासनाच्या आपले सरकार पोर्टलने पोलीस दलाशी संबंधित महत्त्वाच्या सेवा ऑनलाईन उपलब्ध करून दिल्या गेल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून अनेक कामांसाठी पोलीस ठाण्यात प्रत्यक्ष जाण्याची गरज उरली नाही. त्यामुळे आता ऑनलाईन उपलब्ध असलेल्या प्रमुख सेवांची यादीच स्थानिक पोलीस स्टेशनने प्रसिद्ध केली आहे. चारित्र्य प्रमाणपत्र, नोकरी किंवा व्यवसायासाठी लागणारे चारित्र्य प्रमाणपत्र आता ऑनलाईन अर्जाद्वारे मिळते. भाडेकरू माहिती नोंदणी, घरमालक आता त्यांच्या भाडेकरूंची माहिती आपले सरकार केंद्रावरून किंवा स्वतः पोर्टलवरून पोलिसांना कळवू शकतात. बेपत्ता वस्तूंची नोंद मोबाईल, पाकीट किंवा कागदपत्रे हरवल्यास त्याची तक्रार ऑनलाईन नोंदवून तत्काळ पोलीस पावती डाऊनलोड करता येते.




# 'अगस्तिचे' श्रम संस्कार शिबिर संपन्न

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले येथील अगस्ति कला वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर तालुक्यातील मौजे गर्दनी येथे नुकतेच पार पडले. १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता संस्थेचे अध्यक्ष इंजिनिअर सुनील दातीर , सरपंच सौ.साधनाताई अभंग यांच्या प्रमुख उपस्थितीत तर संस्थेचे सचिव सुधाकरराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिराचा उद्घाटन समारंभ करण्यात आला. शिबिर काळात शाश्वत विकासासाठी युवक: पाणलोट आणि पडीक जमीन व्यवस्थापन या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ग्रामस्वच्छता अभियान, वृक्षारोपण, पर्यावरण जाणीव जागृती आणि संवर्धन, व्यसन मुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, पडीक जमीन व्यवस्थापन आदी कार्यक्रम राबविण्यात आले. गर्दनी येथील रत्नागिरी माता गडाची स्वच्छता करण्यात आली व १५ गोणी प्लास्टिक जमा करून प्लास्टिक मुक्त गड ही मोहिम हाती घेतली. तर याच गडावर वृक्षारोपण करण्यासाठी जवळपास ३०० खड्डे खोदण्यात आले. गावातील मुख्य रस्ते, सार्वजनिक जागा, स्मशानभूमी, शाळा, पाणवठे येथील स्वच्छता करून स्वच्छ व सुंदर गाव हा उपक्रम राबविण्यात आला. पथनाट्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले. दुपारच्या सत्रात विविध विषयांवर मान्यवरांची व्याख्याने झाली. ७ जानेवारी २०२६ रोजी संस्थेचे कायम विश्वस्त गिरजाजी जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आणि संस्थेचे अध्यक्ष इंजिनिअर सुनील दातीर, सचिव सुधाकरराव देशमुख, सुधाकरराव आरोटे, उपसरपंच नारायण जगधने,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ भास्कर शेळके, पोलीस पाटील संतोष अभंग , माजी जि. प. सदस्या सिंधुताई उंबरे, ग्रामसेवक किरण पवार, सोमनाथ घोरपडे, भाऊसाहेब नवले यांच्या प्रमुख उपस्थितीत या शिबिराचा समारोप करण्यात आला.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुनिल मोहटे, प्रा.दीपक देशमुख, प्रा. डॉ. रंजना कदम, प्रा. भानुदास खताळ, प्रा. डॉ. विजय काळे, प्रा. संतोष गावंडे, प्रा. सुप्रिया वैद्य, श्री लहानु जेडगुले , अतुल फापाळे, सर्व ग्रामस्थ,सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत शेतकरी प्रशिक्षण संपन्न

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**




कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी श्रीम. क्रांती चौधरी/मोरे यांच्या विद्यमाने व मंडळ कृषी अधिकारी बेलवंडी बु. श्रीम. शीतल आरु यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे चिंभळे (ता. श्रीगोंदा) येथे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - अन्नधान्य पिके सन २०२५-२६ अंतर्गत ज्वारी, मका व हरभरा पिकांवर एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

या प्रशिक्षण कार्यक्रमात कृषी विज्ञान केंद्र, दहिगाव ने. (ता. शेवगाव) येथील विषय विशेषज्ञ श्री. नंदकुमार दहातोंडे यांनी तज्ज्ञ मार्गदर्शन केले. त्यांनी रब्बी हंगामातील प्रमुख पिकांबाबत सखोल व तांत्रिक माहिती देत आधुनिक शेती तंत्रज्ञान, कीड-रोग व्यवस्थापन व खत व्यवस्थापन याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच कांदा व डाळिंब यांसारख्या पिकांवरील सुधारित तंत्रांचा आढावा घेतला. कार्यक्रमात क्षेत्र भेटी, शेतकऱ्यांसोबत सविस्तर चर्चा तसेच प्रश्नोत्तर सत्राचा समावेश होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रगतशील शेतकरी श्री. राजेंद्र (काका) गायकवाड यांनी भूषविले.


यावेळी सरपंच श्री. संजय सावंत (ग्रामपंचायत चिंभळे), उपसरपंच श्री. वैभव गायकवाड, चेअरमन श्री. रावसाहेब पाटील, श्री. अजित गायकवाड, गोंडगे काका, श्री. बाळासाहेब गायकवाड, राजापूर येथील प्रगतशील शेतकरी श्री. शांताराम वाबळे, देवदैठणचे उपसरपंच श्री. तुषार वाघमारे, श्री. शिवाजी (बापू) वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन श्री. अशोक नेर्लेकर, सहाय्यक कृषी अधिकारी, चिंभळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. यावेळी श्रीम. दळवी, श्री. मेहेत्रे गोरख, श्री. केशव अनारसे, श्री. विशाल सूर्यवंशी व श्रीम. घोडके यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. प्रतिक कांबळे, सहाय्यक कृषी अधिकारी, पिंप्री कोलंदर यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. बाळकृष्ण बनकर, सहाय्यक कृषी अधिकारी, बेलवंडी बु. यांनी केले. या प्रशिक्षण कार्यक्रमास परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अँड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# खाजगी कोचिंग क्लासेसवर मोठी बंधने

## शिक्षण विभागाचा मोठा निर्णय



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील शाळा, खासगी शिकवणी वर्गांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताण निर्माण होऊ नये यासाठी शालेय शिक्षण विभागाने मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत.

सर्वोच्च न्यायालयातील याचिकेसंदर्भात न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर, शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या जिल्हास्तरीय निरीक्षण समितीत उच्च व तंत्रशिक्षण सहसंचालक, माध्यमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी हे सदस्य असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने नियुक्त सामाजिक कार्यकर्ता, बालमानसतज्ज्ञ नामनिर्देशित सदस्य असणार आहेत.

'शंभर किंवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थिसंख्या असणाऱ्या संस्थेत किमान एक पात्र समुपदेशक, मानसशास्त्रज्ञ यांची नियुक्ती करावी, शंभरपेक्षा कमी विद्यार्थिसंख्या असणाऱ्या ठिकाणी बाह्य मानसिक आरोग्य व्यावसायिकांची मदत घ्यावी,' अशा सूचना शिक्षण विभागाने दिल्या आहेत.

खासगी शिकवणी वर्गांना एका महिन्याच्या आत तक्रार निवारण यंत्रणा तयार करावी लागणार आहे. त्याची माहिती अधिकृत संकेतस्थळावर आणि व्यवसायाच्या ठिकाणी ठळकपणे प्रदर्शित करण्याची सूचना शालेय शिक्षण विभागाने दिली आहे.

तक्रार निवारण यंत्रणेत तक्रार नोंदविण्याची पद्धत, जबाबदार अधिकारी, तक्रार निवारणाची कार्यपद्धती निश्चित करावी लागणार आहे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यरत अध्यापक, कर्मचाऱ्यांना प्रमाणित मानसिक आरोग्य तज्ज्ञाकडून वर्षातून दोन वेळा प्रशिक्षण अनिवार्य राहील. सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये मानसिक आरोग्य सेवा, रुग्णालये, आत्महत्या प्रतिबंधात्मक हेल्पलाइनकडे तत्काळ संदर्भ देण्याची लेखी कार्यपद्धती तयार करून त्याची अंमलबजावणी करावी, टेलिमानस, आत्महत्या प्रतिबंधात्मक हेल्पलाइन क्रमांक वसतिगृह, वर्गखोल्या, सामायिक वापराची ठिकाणे, शिकवणी वर्गाच्या संकेतस्थळावर ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक आहे, असे नमूद करण्यात आले आहे.

खासगी शिकवणी वर्गांमध्ये प्रवेश मिळणे हे वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कायदा अशा संस्थांमध्ये प्रवेशासाठी किंवा स्पर्धा परीक्षांमध्ये यशासाठी कोणतीही हमी देत नाही, याबाबत विद्यार्थी आणि पालकांना खासगी शिकवणी चालकांनी स्पष्टपणे सांगण्याची सूचनाही शिक्षण विभागाने केली आहे.

# राहुरी कृषी विद्यापीठामार्फत निंबवडे येथे हॉर्टसॅप अंतर्गत डाळिंबावरील तेल्या रोगाबाबत मार्गदर्शन

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**




महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी व कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे समन्वित हॉर्टसॅप प्रकल्पांतर्गत २०२५-२६ या वर्षासाठी निंबवडे (ता. आटपाडी, जि. सांगली) गावात डाळिंब पिकावरील तेल्या रोगासाठी आर्थिक नुकसान पातळी आढळून आलेल्या क्षेत्रांसाठी विशेष सल्ला देण्यात आला. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील वनस्पती रोगशास्त्र व अनुजीवशास्त्र विभागाने तयार केलेली डाळिंब तेल्या रोगावरील सविस्तर मार्गदर्शन पुस्तिका ऑनलाईन ई-मेल व व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून संबंधित तालुका कृषी अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी श्री. रविंद्र गुटकुडे यांना पाठविण्यात आली होती. सदर मार्गदर्शक पुस्तिकांचे निंबवडे ग्रामपंचायत कार्यालयात तसेच तेल्या रोगाने आर्थिक नुकसान पातळी ओलांडलेल्या शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेट देऊन वाटप करण्यात आले. या दरम्यान शेतकऱ्यांना डाळिंब तेल्या रोगाचे लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, योग्य कीड-रोग नियंत्रण पद्धती व शाश्वत व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यापीठामार्फत सुचविण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे शेतकऱ्यांना वेळेवर व अचूक नियंत्रण करण्यास मदत होणार आहे.

सदर प्रक्षेत्र भेटीसाठी प्रकल्प प्रमुख तथा विभाग प्रमुख डॉ. रविंद्र गायकवाड, प्रकल्प समन्वयक डॉ. संजय कोळसे व संशोधन सहयोगी डॉ. प्रवीण खैरे, हॉर्टसॅप प्रकल्प, वनस्पती रोगशास्त्र व अनुजीवशास्त्र विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# सायकलिंग खेळासाठी १० व ११ जानेवारीला राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सायकलिंग आसोसिएशन ऑफ महाराष्ट्र व सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच स्पोर्टस ऑथॉरिटी ऑफ इंडिया (SAI) यांच्या मार्गदर्शनाखाली सायकलिंग खेळासाठी विविध क्रीडा प्रकारांची निवड चाचणी घेण्यात येणार आहे.ही निवड प्रक्रिया रोड सायकलिंग,ट्रॅक सायकलिंग व माऊंटन बाईक (एम.टी.बी.) या प्रकारांसाठी असून १४-१५ वर्षे वयोगटातील (जन्म २०११ व २०१२) मुले व मुली यांच्यासाठी शारीरिक व मैदानी चाचणी घेतली जाणार आहे.

या निवड चाचणीत मुलांसाठी १६०० मीटर धावणे, व्हर्टिकल जंप व ब्रॉड जंप,तर मुलींसाठी ८०० मीटर धावणे,व्हर्टिकल जंप व ब्रॉड जंप अशा चाचण्या घेण्यात येणार आहेत.या चाचणीच्या आधारे पात्र खेळाडूंची निवड करण्यात येईल. संपूर्ण महाराष्ट्रातील खेळाडूंना या निवड चाचणीत सहभागी होता येणार असल्याचे आवाहन सायकलिंग आसोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सचिव प्रा.संजय साठे यांनी केले आहे.ही निवड प्रक्रिया दि.१० व ११ जानेवारी २०२६ रोजी वाडिया पार्क क्रीडा संकुल, अहिल्यानगर येथे सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे प्रतिनिधी सुदाम रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.

या चाचणीत निवड झालेल्या खेळाडूंना दिल्ली येथे स्पोर्टस ऑथॉरिटी ऑफ इंडिया (SAI) यांच्या सहकायनि राष्ट्रीय पातळीवरील निवड चाचणीत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. बाहेरील जिल्ह्यातून येणाऱ्या सहभागी खेळाडूंसाठी निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

## १४-१५ वयोगटातील खेळाडूंना संधी

निवड चाचणीसाठी शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र,जन्म दाखला, आधार कार्ड व एक पासपोर्ट साईज फोटो आवश्यक आहे. अशी माहिती अॅड.विक्रम रोठे अध्यक्ष, सचिव प्रा.संजय साठे, खजिनदार भिकन अंबे यांनी दिली आहे. अधिक माहितीसाठी संपर्क- प्रा.संजय साठे (मो.7972189670), प्रा.साईनाथ थोरात मो. 7410018100) यांच्याशी संपर्क साधावा.

# निवडणूका लांबणीवर

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

नगर पंचायत व नगर परिषदांच्या निवडणुका पार पडल्या. महानगर पालिकांच्या निवडणुका सुरू आहे. फक्त जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका शिल्लक आहे. या निवडणुकांबाबत ग्रामीण भागातील नेत्यांमध्ये मोठी उत्सुकता आहे. याच महिन्यात त्या लागतील, असा अंदाज होता. परंतु त्याचा मुहूर्त टळला आहे. या निवडणुकांवरून संभ्रम असला तरी सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या तारखेत त्या होत नसल्याचे दिसून येते. येत्या महिन्यात त्या होणार नसून एप्रिल, मे महिन्यात होतील, अशी चर्चा आता प्रशासकीय वर्तुळात आहे.सर्वोच्च न्यायालयाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पूर्वी घेण्याचे आदेश दिलेत. नगर पंचायती व नगर परिषदांच्या निवडणुका पार पडल्या. महानगर पालिकांच्या निवडणुका सुरू आहेत.

# सारसनगरमध्ये प्रचारासाठी खासदार लंके मैदानात

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी सारसनगर परिसरातून प्रचार रॅली काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात आणि कार्यकर्त्यांच्या जोशपूर्ण घोषणांमुळे संपूर्ण परिसर निवडणुकीच्या वातावरणाने दणाणून गेला.

या प्रचार रॅलीत खासदार निलेश लंके यांनी स्वतः सहभाग घेत मतदारांशी थेट संवाद साधला. घराघरांत जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेत त्यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले. जनतेच्या प्रश्नांना न्याय देणारे आणि सर्वसामान्यांच्या हिताचे काम करणारे नेतृत्व महाविकास आघाडीकडे असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

महाविकास आघाडीच्या प्रभाग क्रमांक १३ मधील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे उमेदवार रोहन रमेश शेलार (अ), कल्याणी महेंद्र गाडळकर (ब), अर्चना सुरेश गायकवाड (क) आणि चंद्रकांत आनंद उजागरे (ड) यांच्या प्रचारासाठी ही रॅली आयोजित करण्यात आली होती.

उमेदवारांनी नागरिकांशी संवाद साधत प्रभागाच्या विकासासाठी संधी देण्याचे आवाहन केले.

या रॅलीत राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तथा माजी महापौर अभिषेक कळमकर, राष्ट्रवादीचे विधानसभा अध्यक्ष निलेश मालपाणी, माजी नगरसेवक संजय झिंजे, मतीन शेख आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नगरसोलापूर रोड, कोंबडीवाला मळा तसेच सारसनगर परिसरातून ही प्रचार रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान नागरिकांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारांचे स्वागत करत सकारात्मक प्रतिसाद दिला.

# भक्ती तरुणपणीच करावी, ती म्हातारपणावर सोडू नये

- गौडीया वैष्णवाचार्य युगलशरण महाराज
- वैष्णवी भजनी मंडळ आयोजित श्री हनुमान कथेचा तिसरा दिवस

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**



ज्याप्रमाणे अंगण सजवल्याशिवाय भगवान घरात येत नाहीत,तसेच मनातील घाण दूर केल्याशिवाय भक्तीचे फळ मिळत नाही भक्ती तरुणपणीच करावी,ती म्हातारपणावर सोडू नये,उद्याचा भरोसा कोणी पाहिलाय आजच प्रभूंशी नातं जोडावं.

असे प्रतिपादन गौडीया वैष्णवाचार्य युगलशरण महाराज यांनी केले.

लालटाकी येथील खाकीदास मठात वैष्णवी भजनी मंडळाच्या आयोजीत श्री हनुमान कथेचे ( चरीत्र ) तिसऱ्या दिवशी निरूपण गौडीया वैष्णवाचार्य युगलशरण महाराज हे करत आहेत.

युगलशरण महाराज म्हणाले ज्याला रामचरणाच्या भक्तीची इच्छा आहे त्याने हनुमानाला शरण जा जीवनात शांती मिळेल भक्तीच्या यात्रेत फक्त रामनामाचे टिकीट पाहीजे भक्तीच्या मार्गावर नित्य उपासना,जप महत्वाचा. युगलशरण महाराज कथेच्या तिसऱ्या दिवशी किष्किंधा कांड, सुंदरकांड आणि लंकाकांड यांच्या माध्यमातून चांगला संदेश दिला.

आजच्या झांकीत किष्कितकांडमध्ये राम, लक्ष्मण श्री हनुमानाकडे गेले आहेत त्या हनुमानजींचं अद्भुत पात्र दर्शन घेतलं,ज्यांची भूमिका हरिभाऊ डोळसे यांनी साकारली होती. सूत्रसंचालन वैष्णवी लढ्ढा हिने केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वैष्णवी भजनी मंडळाच्या सर्व सदस्या परिश्रम घेत आहेत. यावेळी मोठ्या संख्येने महिला व पुरुष उपस्थित होते.

# कुटुंबाला अमानुष मारहाण

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

उसने दिलेले पैसे परत मागितल्याच्या कारणावरून एका कुटुंबावर अमानुष मारहाण करत विनयभंग व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याची धक्कादायक घटना नेवासा तालुक्यातील सलाबतपूर येथे घडली आहे. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी एकलव्य संघटनेच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले आहे.रुक्मिणी प्रकाश गायकवाड (रा. सलाबतपूर, ता. नेवासा) यांच्या मुलाने काही दिवसांपूर्वी उसने पैसे दिले होते. हे पैसे परत मागितल्यावर विकास लक्ष्मण चरभरे, सतीश लक्ष्मण चरभरे, अशपाक अल्लाबक्ष शेख, सोनाबाई लक्ष्मण चरभरे व अनिता अशपाक शेख यांनी गायकवाड कुटुंबीयांना बेदम मारहाण केली.

# राजस्थानच्या भरतपुर मधील सनातन स्कूलने रंगोत्सव स्पर्धेत मिळविले यश

- तेलुगू चित्रपट अभिनेते पोसानी कृष्णा मुरली यांच्या हस्ते बक्षीस वितरण

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**




सनातन स्कूल, भरतपूरने रंगोत्सव सेलिब्रेशन राष्ट्रीय कला स्पर्धेत मिळवले अप्रतिम यश मुंबईतील रंगोत्सव सेलिब्रेशन या संस्थेच्या वतीने आयोजित राष्ट्रीय स्तरावरील कला स्पर्धेत राजस्थानमधील भरतपूर येथील सनातन स्कूलने अप्रतिम कामगिरी केली आहे. ही संस्था २०१२ पासून देशभरातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी रंग कला, रेखाचित्र, अशा विविध प्रकारांच्या स्पर्धा आयोजित करते आणि आता आंतरराष्ट्रीय स्तरावरही विस्तार करत आहे.

या स्पर्धेत सनातन स्कूलमधील ३०६ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. प्रथम क्रमांक तनिष गोयल, द्वितीय क्रमांक मनिका, तृतीय क्रमांक मोक्षिका सिंग आणि चतुर्थ क्रमांक हर्ष गौतम यांनी पटकावला. बक्षीस वितरण समारंभ अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध तेलुगू चित्रपट अभिनेते, पटकथा लेखक आणि दिग्दर्शक पोसानी कृष्णा मुरली उपस्थित होते. त्यांनी विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करून प्रोत्साहन दिले. तसेच प्रमुख मान्यवर डॉ. एस. सी. शर्मा यांनीही कार्यक्रमाला शोभावर्धन केले आणि विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

सनातन स्कूल गेल्या दोन वर्षांपासून या स्पर्धेत सातत्याने सहभागी होत आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे रंगोत्सव सेलिब्रेशन संस्थेचे संचालक संग्राम दाते यांनी अभिनंदन केले आहे. यंदाच्या या यशस्वी कामगिरीने संपूर्ण शाळा परिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंदाने विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमाचे कौतुक करत पुढील वर्षीही अशीच यशस्वी कामगिरी अपेक्षित असल्याचे सांगितले.

# इगतपुरीत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचा जागर



**इगतपुरी : (समर्थ गांवकरी)**

पुण्यात्मा प्रभाकर सेवा मंडळ, अनुसयात्मजा मतिमंद निवासी विद्यालय, इंदिरा भारती कर्णबधिर निवासी विद्यालय आणि रुकमाबाई अपंग युवक स्वयम सहायता केंद्र इगतपुरी यांच्या वतीने पुज्य रुकम्मा जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते

मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमात कर्णबधिर, गतिमंद तसेच अंध अपंग विद्यार्थ्यांनी आपल्या सुप्त कलागुणांचे प्रभावी दर्शन घडवून उपस्थितांची मने जिंकली. विशेष म्हणजे शारीरिक अडचणींवर मात करत या विद्यार्थ्यांनी हिंदी व मराठी गीते सादर केलीच, पण त्या गाण्यांना स्वतः संगीतही दिले.

# महाराष्ट्रातून बाळासाहेब ठाकरे, शरद पवारांचे नाव पुसायचे आहे

## हर्षवर्धन सपकाळ यांचा दावा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



"नगरपरिषद निवडणुकीत अनेक ठिकाणी बोगस मतदान झालं. अनेक व्हिडिओ देखील समोर आले. आमचा संविधानावर विश्वास असून सत्य पुढे घेऊन जात आहे. आम्ही सत्तेचा खेळ नाहीतर लोकशाही वाचवण्याच्या अनुषंगाने लढत आहोत.
इंग्रज जुलमी होते. त्यांच्याकडे हुकूमशाही आणि दंडेलशाही होती. त्यावेळी काँग्रेसने संघर्ष उभा केला. ज्यावेळी काँग्रेसच्या नेत्यांना अटक झाली, तेव्हा अहिल्यानगरच्या जेलमध्ये ठेवण्यात आलं"
असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

"आज त्याचं पद्धतीचं काम सुरू आहे. विरोधक प्रचाराला फिरू नये यासाठी हेलिकॉप्टर, हेलिपॅड ब्लॉक करुन ठेवण्याचे काम सत्ताधारी करत आहेत.

संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी आम्ही नागरिकांना अर्थात हात देत आहोत. निवडणुकीत रस्ते, पाणी, ट्रॅफिक, पथदिवे, सुरक्षा, सौंदर्य हे मुद्दे प्रचारात पाहिजेत" असं हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

महाराष्ट्रातलं वातावरण खराब करण्यासाठी काही लोकांना नेमून दिलं आहे. त्यात पहिले नगरचे देखील नाव येतं. विलासराव देशमुख यांच्या बद्दल वक्तव्य केलं.

त्याचा आम्ही निषेध करतो. भाजपाला विलासरावंसह गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन, बाळासाहेब ठाकरे यांच्यासह शरद पवारांचे नावे पुसून टाकायचे आहे" असा दावा हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

"भाजपने गेल्या काही वर्षात अटलजींच्या नावाने कोणतीही योजना आणली नाही. त्यामुळे त्यांना अटलजी, अडवाणी, हेडगेवार, गोळवलकर यांचेही नाव पुसायचे आहे. नागपूर संघ कार्यालयातील गोळवलकर आणि हेडगेवार यांचे पुतळे काढून तिथे मोदी आणि शहांचे पुतळे बसवायचे आहेत" असा आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी संवाद साधला.

यावेळी खासदार निलेश लंके, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण, शरद आहेर, राष्ट्रवादीचे विधानसभा अध्यक्ष निलेश मालपाणी, माजी नगरसेवक संजय झिंजे, बाळासाहेब भंडारी, फिरोज खान आदींसह उमेदवार व पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ओतूर महाविद्यालयात भूगोल सप्ताहाचे उद्‌घाटन

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ओतूर येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब वाघीरे महाविद्यालयामध्ये 14 जानेवारी राष्ट्रीय भूगोल दिनानिमित्त भूगोल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या सप्ताहाची सुरुवात 9 जानेवारी रोजी भौगोलिक उपकरणांच्या प्रदर्शनाद्वारे करण्यात आली. सदर सप्ताहाचे उद्‌घाटन पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे खजिनदार मोहनराव देशमुख, संस्थेचे प्रशासन सहसचिव ए. एम. जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांच्या हस्ते करण्यात आले. उद्‌घाटन प्रसंगी मनोगतात ए. एम. जाधव यांनी आंतरराष्ट्रीय घडामोडीचा भूगोल विषयाशी असणारा संबंध अधोरेखित केला. सद्यस्थितीतील व्हेनेझुएला देशावर आलेले गंभीर संकट हे एक भौगोलिक साधन संपत्तीचे चिंताजनक उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. मा. मोहनराव देशमुख यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांनी अत्याधुनिक जीपीएस तंत्रज्ञान आत्मसात करावे असे सांगितले. असे भौगोलिक कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण कलागुणांना वाव देण्यासाठी वेळोवेळी आयोजित करण्यात यावे अशी अपेक्षा व्यक्त केली. या प्रदर्शनामध्ये महाविद्यालया तील विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी भेट देऊन उपकरणांची माहिती जाणून घेतली. भूगोल सप्ताहाचे आयोजन भूगोल विभागप्रमुख डॉ.आमश्या पाडवी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार असून सदर भूगोल सप्ताहामध्ये रांगोळी स्पर्धा, पोस्टर प्रदर्शन,भौगोलिक व पर्यावरणीय छायाचित्र स्पर्धा, शॉर्ट व्हिडिओ स्पर्धा (रिल्स), वक्तृत्व स्पर्धा, पाककला,माजी विद्यार्थी मेळावा,भूगोल विषया वर विशेष व्याख्याने इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. उपस्थित कार्यक्रमा साठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. कल्याण सोनवणे, भूगोल विभागप्रमुख डॉ.आमश्या पाडवी,डॉ. वसंत गावडे,डॉ. राजेश रसाळ डॉ.नंदकिशोर उगले, डॉ. संदिपान गव्हाळे डॉ. जितेंद्र घोडके,डॉ. रमेश काशिदे , डॉ.निलेश काळे,डॉ. रमेश गोपाळे,डॉ.अंकुश मोधे,डॉ. राजेंद्र आंबवणे,डॉ.रोहिणी मदने, डॉ.जनार्दन नाडेकर व आदी मान्यवर उपस्थित होते. सदर उपक्रमांच्या आयोजनासाठी संस्थेचे पदाधिकारी यांनी मनस्वी समाधान व्यक्त करून आयोजकांचे कौतुक केले.



# अपहार केलेली सर्व रक्कम फिर्यादी यांना परत करण्यात ओतूर पोलीसांना यश

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**




दिनांक १९/०३/२०२४ रोजी ११:३० वा.ते दि:- २०/०६/२०२५ रोजी १५:०० वा. चे दरम्यान विष्णु देवराम दाते रा:-आणे ता. जुन्नर जि.पुणे हे सेवानिवृत्त मुख्याध्यापक असुन त्यांच्या ७ व्या वेतन आयोगाचे ३ च्या व ४ थ्या हप्त्याची एकुण रक्कम १,६०,३०१ रू चुकुन आरोपी नामे चिंतामण मारूती तळपे रा:- केवाडी ता:- जुन्नर जि.पुणे याच्या बँक खात्यावर जमा झाले होते. फिर्यादी यांनी आरोपीस वेळोवेळी सदरची रक्कम शाळेच्या बँक खात्यावर जमा करण्याबाबत सांगीतले असता आरोपीने सदरची रक्कम बँकेच्या खात्यात जमा न करता ती स्वतः चे फायदयाकरीता वापरून सदरच्या रकमेचा अपहार केला होता.

सदरबाब ओतूर पोलीस स्टेशनला दिनांक २०/०६/२०२५ रोजी गुन्हा दाखल करून पुढील तपास पो.हवा. आनंदा भवारी यांच्याकडे देण्यात आला होता. पोलीसानी दाखल गुन्हयाचा सखोल तपास करून आरोपी चिंतामण मारूती तळपे रा:- केवाडी ता:- जुन्नर जि.पुणे याच्याकडुन १,६०,३०१ रू ची रोख रक्कम जप्त केली आहे. सदरची रोख रक्कम दिनांक ०८/०१/२०२६ रोजी ओतूर पोलीसांनी फिर्यादी विष्णु देवराम दाते रा:-आणे ता.जुन्नर जि.पुणे यांना परत केली आहे.दाखल गुन्हयाचा तपास संदिप सिंह गिल, पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण,रमेश चोपडे अप्पर पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण,धनंजय पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी जुन्नर विभाग जुन्नर, ओतूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि लहु थाटे यांचे मार्गदर्शनाखाली पो.हवा आनंदा भवारी, महीला पो.हवा.भारती भवारी,पो.हवा. विलास कोंढावळे यांनी केला आहे.

# कोटक ऑल्ट्सने कॅटलिस्ट अवॉर्ड्सची केली सुरुवात

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

कोटक ऑल्टरनेट ॲसेट मॅनेजर्स लिमिटेड ("कोटक ऑल्ट्स")ने आज कोटक ऑल्ट्स कॅटलिस्ट अवॉर्ड्सची सुरुवात केल्याचे घोषित केले. हा या प्रकारचा पहिला प्लॅटफॉर्म आहे, जो 25 लाख रु. चे बक्षीस देऊन देशातील सर्वोत्तम व्होडकास्टचा सन्मान करेल. सर्वोत्तम व्होडकास्टला पुरस्कृत करण्यामागील उद्देश अस्सल फायनॅन्श्यल कंटेंटसाठी एक मापदंड तयार करण्याचा तसेच लक्षावधी तरुण आणि नवशिक्या गुंतवणूकदारांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना सक्षम बनवणाऱ्या क्रिएटर्सचा सन्मान करण्याचा आहे. महत्त्वाकांक्षी अर्जदार 1 जानेवारी 2025 ते 31 डिसेंबर 2025 दरम्यान प्रदर्शित झालेला आणि यूट्यूबवर सार्वजनिकरित्या उपलब्ध असलेला आपला एखादा व्होडकास्ट 31 जानेवारी 2026 पर्यंत katalyst.kotakalternateasset.com मार्फत स्पर्धेसाठी सादर करू शकतात. अर्ज सादर झाल्यानंतरच्या टप्प्यात या क्षेत्रातील मान्यवर परीक्षकांची एक पॅनल कंटेंटची गुणवत्ता, अस्सलता आणि प्रेक्षकांचा सहभाग यांच्या आधारे सर्व प्राप्त एंट्रीजचे मूल्यमापन करेल. कोटक ऑल्ट्सचे मॅनिजिंग डायरेक्टर श्रीनी श्रीनिवासन म्हणाले, "भारतात आत्ता आर्थिक सहभागाची सर्वात मोठी लाट बघायला मिळते आहे. तुकड्या-तुकड्यांत मिळणारा सल्ला आणि प्रचलित शॉर्टकट्सने गजबजलेल्या डिजिटल विश्वात लक्षावधी नवीन गुंतवणूकदार स्पष्ट माहितीच्या शोधात आहेत. अशावेळी, पॉडकास्ट आणि व्होडकास्ट आर्थिक साक्षरता प्रदान करण्याचे दमदार माध्यम म्हणून पुढे आले आहेत. परंतु, त्यांची गुणवत्ता आणि विश्वसनीयता कमी-जास्त असल्याचे दिसून येते. याचा विचार करून, कॅटलिस्ट अशा एका क्रिएटरवर प्रकाशझोत टाकणार आहे, जो गुंतागुंत सोपी करून सांगतो, विश्वास निर्माण करतो आणि आर्थिक शिक्षण आकर्षक आणि व्यवहार्य बनवतो."

# मेळाव्याचे आयोजन

**राजूरः (समर्थ गांवकरी)**

सत्यनिकेतन संचलित ॲड्. मनोहरराव नानासाहेब देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजूर (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) येथे माजी विद्यार्थी संघ ॲड.एम. एन.देशमुख महाविद्यालय राजुर च्या वतीने माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन रविवार,दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वा. सत्यनिकेतन संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मा.ॲड.मनोहरराव देशमुख व सत्यनिकेतन संस्थेचे संचालक यांचे प्रमुख उपस्थितीत केले आहे.अशी माहिती माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री गणेश मैड यांनी दिली आहे. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून आजपर्यंत शिक्षण घेतलेले व सध्या विविध क्षेत्रांत उच्च पदावर कार्यरत असलेले माजी विद्यार्थी एकत्र आणणे, महाविद्यालयाशी असलेले भावनिक व शैक्षणिक नाते अधिक दृढ करणे.

# दुसऱ्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हलमध्ये सरिता म्हेत्रे कलढोणे सन्मानित




**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

एम. एस. जोशी सभागृह,नवी पेठ,पुणे येथे २ ते ५ जानेवारी मध्ये चार दिवस दुसऱ्या फुले फेस्टीव्हलचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून तसेच बेळगाव, तेलंगणा,गुजरात,आंध्रप्रदेश अबुधाबी,गोवा या ठिकाणाहूनही कवी कवयित्रींनी हजेरी लावली होती.फुलेप्रेमी संविधान दूत विजय वडवेराव हे या फेस्टिव्हलचे आयोजक आहेत. विशेष आकर्षण म्हणजे सर्व कवयित्री ज्ञानज्योती सावित्रीबाई फुलेंच्या वेशभूषेत कवयित्री उपस्थित होत्या.सर्व कवयित्रींना आयोजक संविधान दूत विजय वडवेराव यांच्याकडून हिरवी साडी भेट देण्यात आली होती. फेस्टीव्हल साठी ७०० ते ८०० जणांची उपस्थिती होती.

सकाळचा नाश्ता रुचकर जेवणाची मेजवानी आलेल्या सर्वांना मोफत देण्यात आला. सर्व कवींना संविधान पुस्तक, संविधानमय पॅड,सन्मानचिन्ह व सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले.प्रत्येक जिल्ह्यात माझे संविधान माझी जबाबदारी हा उपक्रम राबविण्यात येतो यात संविधान दूत म्हणून कार्य करणाऱ्या फुले प्रेमींना भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संविधान दूत पुरस्कार व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना फुलेप्रेमी समाज रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.जुन्नर येथील कवयित्री सरिता म्हेत्रे कलढोणे यांना हा मानाचा पुरस्कार या फेस्टिवलमध्ये प्रदान करण्यात आला. सरिता म्हेत्रे कलढोणे या जुन्नर येथे शंकरराव बुट्टे पाटील विद्यालय येथे शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत.या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व क्षेत्रातून कौतुक होत आहे.

# नगराध्यक्षा यांचा विखे पाटील यांच्या हस्ते सत्कार!

**जामखेड: (समर्थ गांवकरी)**



तालुक्याच्या पाणीपुरवठ्यात कुठेही कमतरता भासू देणार नाही, त्याची संपूर्ण जबाबदारी माझी आहे, अशी ठाम ग्वाही जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. जामखेडच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे आहोत, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. प्रांजली चिंतामणी यांच्या निवासस्थानी भेट देत मंत्री विखे पाटील यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी जामखेड नगरपालिकेत विजयी झालेल्या सर्व नगरसेवकांचा सन्मान करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

सत्कारप्रसंगी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, जामखेड नगरपालिका निवडणुकीत सौ. प्रांजली चिंतामणी यांचा झालेला विजय हा सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी अत्यंत आनंददायी आहे. जिल्ह्यातील नगरपालिका निवडणुकांमध्ये भाजप महायुतीला जनतेने मोठे पाठबळ दिले असून, देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष प्रथम क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. जामखेड नगरपालिकेत नगराध्यक्षा आणि त्यांच्या सहकारी नगरसेवकांनी मिळवलेला विजय हा ऐतिहासिक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

तालुक्यातील पाणीप्रश्नाबाबत बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, आमदार सुरेश धस यांच्या पाणी योजनेमुळे जामखेडचा पाणीपुरवठा कुठेही कमी होणार नाही. तालुक्यातील जनतेवर कोणताही अन्याय होऊ नये, याची दक्षता घेण्याची जबाबदारी आपण स्वतः स्वीकारत असल्याचे त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले. या कार्यक्रमास जिल्हा बँकेचे संचालक अंबादास पिसाळ, भाजपाचे अध्यक्ष नितीन दिनकर, मनोज कुलकर्णी, विनायक देशमुख यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जामखेडच्या नगराध्यक्षा सौ. प्रांजली चिंतामणी यांचा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी निवासस्थानी जाऊन केलेला सत्कार यावेळी उपस्थितांच्या विशेष चर्चेचा विषय ठरला!

# अभूतपूर्व संधी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

आर्थिक संरक्षणापलीकडे जाऊन स्वप्नांना बळ देण्याच्या आपल्या बांधिलकीला अधिक दृढ करत भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह जीवन विमा कंपन्यांपैकी एक आणि बीसीसीआयची अधिकृत भागीदार असलेल्या एसबीआय लाईफ इन्शुरन्सने कोलकातास्थित उदयन एनजीओमधील पाच तरुण मुलींसाठी एका विशेष 'मीट अँड ग्रीट' कार्यक्रमाचे आयोजन केले. या उपक्रमामुळे त्यांना विशाखापट्टणम येथील एसीए–व्हीडीसीए क्रिकेट स्टेडियममध्ये भारतीय महिला क्रिकेट संघाच्या सदस्यांशी प्रत्यक्ष भेटून संवाद साधण्याची दुर्मिळ आणि प्रेरणादायी संधी मिळाली. उदयन एनजीओमधील सुपर्णा महतो (9); एंजेल बौरी (10); रोशनी कर्मकार (10); मिनाती बास्के (10); अनुराधा मंडी (11) या पाच तरुण मुलींनी भारतीय महिला क्रिकेट संघातील हरमनप्रीत कौर, स्नेह राणा, शफाली वर्मा आणि हरलीन देओल यांसारख्या प्रसिद्ध खेळाडूंशी संवाद साधत अविस्मरणीय दिवस घालवला.

# जेव्हा रोमँटिक ट्रिप अचानक धोकादायक वळणावर जाते तेव्हा काय होते?

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

भारतातील प्रमुख डिजिटल एंटरटेनमेंट प्लॅटफॉर्म्सपैकी एक असलेल्या, हंगामा ओटीटीने 8 जानेवारी 2026 रोजी आपली नवीन ओरिजिनल सिरीज प्रयागराज की लव्ह स्टोरी लॉन्च केली. ही सिरीज प्रयागराजच्या सुंदर रस्त्यांवर, ऐतिहासिक घाटांवर आणि खास आकर्षक वातावरणात सेट केली आहे. सुरुवातीला रोमँटिक वाटणारी ही ट्रिप अचानक रोमांचक आणि धोकादायक सर्पायव्हल स्टोरीमध्ये बदलते. गौरव शर्मा, अंबिका वाणी, पवित्रा पुनिया आणि मनीष वाधवा यांसारख्या प्रतिभावान कलाकारांसह, हा शो रोमँस आणि सस्पेन्सचे मिश्रण आहे, जिथे एक तरुण जोडपे अचानक अशा शहरात अडकतात जे त्यांना परके वाटू लागते.




कथेत मुख्य भूमिकेत अंशुल सिंग आणि सोनिया शुक्ला आहेत, ज्यांची रोमँटिक सुट्टी अचानक धोकादायक वळण घेते, जेव्हा ते नकळतपणे रक्षक बनलेल्या निर्दयी गँगच्या जाळ्यात अडकतात. जे सुरुवातीला विश्वासाने भरलेले होते, ते लवकरच फसवणुकीत बदलते, आणि जोडप्याला दाट जंगलातून, अरुंद रस्त्यांमधून आणि गर्दीच्या बाजारातून पळावे लागते, जेणेकरून ते त्यांच्या मागे असलेल्या लोकांपेक्षा एक पाऊल पुढे राहू शकतील. भीती जवळ येते आणि प्रत्येक कोपऱ्यावर धोका उभा असतो, त्यामुळे त्यांचे नाते अशा दबावाखाली येते जिथे चुकीसाठी जागा नसते.

अंशुल सिंगची भूमिका साकारणाऱ्या गौरव शर्मा यांनी सांगितले, "अंशुल एक संवेदनशील आणि समजूतदार मुलगा आहे, पण सोशल मीडियाचा त्यावर मोठा प्रभाव आहे. जेव्हा परिस्थिती हाताबाहेर जाते, तेव्हा त्याचे आतले विचार आणि भावना काम करतात. मला सर्वात जास्त आवडले ते म्हणजे आरामदायक स्थितीतून संकटाच्या स्थितीत जाण्याचा हा बदल दाखवणे. प्रयागराजमधील प्रत्यक्ष ठिकाणी शूटिंग केल्याने प्रत्येक सीन अधिक खरा आणि जवळचा वाटला. प्रेक्षकांना त्या गोंधळाचा आणि भीतीचा अनुभव मिळतो."



# जय भवानी माता विद्यालयाच्या भव्य आंतरशालेय क्रिंडा स्पर्धा संपन्न

**(समर्थ गांवकरी)**

आदर्श महिला विकास संस्था. संगमनेर. संचलित जय भवानी माता विद्यालय केळुंगण ता अकोले विद्यालयाच्या आंतरशालेय हिवाळी क्रीडा स्पर्धा १ जानेवारी २०२६ ते ५ जानेवारी २०२६ दरम्यान संपन्न झाल्या या स्पर्धेत लहान गट व मोठा गट . खो -खो, कबडडी, १00 मी, २00 मी, ४०० मी धावणे, रस्सीखेच, लांबउड्डी, उंचउड्डी, क्रिकेट तसेच इतर मनोरंजक खेळांचा समावेश होता स्पर्धेचे उद्धाटन गावातील प्रतिष्ठीत मान्यवर व विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विदयालयाचे मुख्याध्यापक श्री लांडगे पी.वाय, संस्था विस्तार अधिकारी व क्रिडा विभागाचे प्रमुख श्री जाधव एन एल. यांच्या विशेष परिश्रमाने स्पर्धा संपन्न झाल्या. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच आदर्श महिला विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, रजिस्टार श्री जाधव आर एस (दादा) व सर्व पदाधिकारी यांनी स्पर्धेस शुभेच्छा दिल्या.

# शिर्डीतील हॉटेलवर अल्पवयीन भाचीवर अत्याचार, पोक्सोसह गुन्हा दाखल!

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**



संगमनेर तालुक्यात मामा–भाचीच्या पवित्र नात्याला काळीमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मालुंजे परिसरातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला कॉलेजला सोडतो, असे सांगून तिच्या चुलत मावस मामाने दुचाकीवर बसवले; मात्र कॉलेजला न नेता थेट शिर्डी येथील एका हॉटेलवर नेऊन तिच्यावर बळजबरीने अत्याचार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात पोक्सो व बलात्कारासह गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेचा तपशील : पीडित अल्पवयीन मुलगी ११ वी सायन्सचे शिक्षण घेत असून ती मालुंजे परिसरातून नियमितपणे कॉलेजला ये–जा करत होती. २९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी सख्या मामाने शेतीकाम असल्याचे सांगितल्याने, मुलगी मैत्रिणीसोबत आश्वी येथील एका सुपरमार्केटपर्यंत आली. तेथे मैत्रीण खरेदीसाठी गेल्यानंतर बाहेर उभी असताना चुलत मावस मामा दुचाकीवर आला व "कॉलेजला सोडतो" असे सांगून तिला गाडीवर बसवले.

निमगावजाळी–लोहारे मार्गे जात असताना "कुठे नेताय?" असे विचारल्यावर त्याने दमदाटी केली. दुपारी सुमारे २ वाजता शिर्डी येथे पोहोचल्यावर आरोपीने "आळंदीला लग्न करायला चल, नाहीतर हॉटेलमध्ये चल" अशी धमकी दिली. मुलीने विरोध करून आपले वय कमी असल्याचे सांगितले असतानाही, आरोपीने तिचे म्हणणे न ऐकता हॉटेलमधील एका खोलीत नेऊन तिच्या इच्छेविरुद्ध बलात्कार केला, असा आरोप तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर तिला पुन्हा दुचाकीवर बसवून सोडून दिले.

तक्रार व कारवाई : घटनेनंतर प्रकृती बिघडल्याने मुलीने नातेवाईकांना प्रकार सांगितला. नातेवाईकांनी आरोपीला पाठीशी न घालता ८ जानेवारी २०२६ रोजी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोक्सो व बलात्कारासह गंभीर कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

सामाजिक चिंता व मागणी : संगमनेर परिसरात अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. हॉटेल, लॉज, कॅफे यांची सहज उपलब्धता लक्षात घेता, अशा ठिकाणांचे व्यवस्थापक/मालक सहआरोपी ठरू शकतात, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे. काही प्रकरणांत तपासादरम्यान हॉटेल–लॉज मालकांवर ठोस कारवाई होत नसल्याचे आरोपही होत आहेत.

या पार्श्वभूमीवर, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी या घटनेकडे लक्ष देऊन हॉटेल–लॉज–कॅफे संदर्भातील कारवाई कठोरपणे राबवावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. त्यांच्या पूर्वीच्या कार्यकाळात अशा ठिकाणांवर कारवाई झाल्याने बाल लैंगिक अत्याचारांना आळा बसल्याचेही नमूद केले जात आहे. — पुढील तपास सुरू आहे.

# नूतन माध्यमिक विद्यालय पांजरेचे वर्चस्व!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



आज दिनांक ०६ जानेवारी २०२६ रोजी ए.एस.के. फाउंडेशन व स्पोर्टस व्हिलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरशालेय क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्पर्धांचे उद्घाटन ए.एस. के. फाउंडेशनचे समन्वयक श्री. अरुण बांबळे यांच्या हस्ते झाले. यावेळी श्री. कैलास कोकरे, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. संजय उकिर्डे, माध्यमिक विद्यालय शेंडीचे विद्या. प्राचार्य श्री. रोंगटे तसेच परिसरातील विविध शाळांचे क्रीडाशिक्षक उपस्थित होते.

या स्पर्धांमध्ये कबड्डी व खो-खो या दोन प्रमुख क्रीडा प्रकारांचा समावेश होता. कबड्डी स्पर्धेत नूतन माध्यमिक विद्यालय पांजरे संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला, तर जय भवानी माता विद्यालय केळुंगण संघाने द्वितीय क्रमांक मिळविला.

खो-खो स्पर्धेतही नूतन माध्यमिक विद्यालय पांजरे यांनी अव्वल स्थान मिळवत वर्चस्व सिद्ध केले. या स्पर्धेत माध्यमिक विद्यालय बारी संघाने द्वितीय क्रमांक पटकावला.

या निमित्ताने जय भवानी माता विद्यालय केळुंगण, माध्यमिक विद्यालय बारी, माननीय मधुकरराव पिचड विद्यालय पाडोशी, माध्यमिक विद्यालय शेंडी आदी सर्व सहभागी विद्यालयांच्या क्रीडाशिक्षकांचा ट्रॉफी व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कबड्डी व खो-खो स्पर्धांसाठी सराव व तयारीसाठी श्री. खानेकर दिनकर सर, श्री. वाळे सर तसेच स्पोर्टस व्हिलेजचे क्रीडाशिक्षक विष्णू मंडल यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षकांनी मेहनत घेतली. विशेषतः श्री. रावसाहेब बोंबले सर यांनी फोटोग्राफी, रांगोळी व इतर सजावटीची जबाबदारी उत्कृष्टरीत्या पार पाडली.

या स्पर्धांचे नियोजन आदर्श महिला विकास संस्था चे संस्थापक आदरणीय श्री. राघू दादा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांनी या उपक्रमासाठी विशेष प्रोत्साहन देत क्रीडा संस्कृतीला चालना दिली.

# जानकी विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

- नानजीभाई ठक्कर यांचा विशेष सन्मान!

**कल्याण–टिटवाळा : (समर्थ गांवकरी)**





श्री विद्या प्रसारक मंडळ संचालित जानकी विद्यालय, कल्याण–टिटवाळा येथे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात सामाजिक कार्यकर्ते नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंकज गिरी, समाजसेवक कृष्णकांत दुवे, बाळासाहेब काकड पाटील, सौ. सुनिता काकड पाटील, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला सुमारे ७०० ते ८०० नागरिकांनी हजेरी लावली.

विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य व सांस्कृतिक कला सादर करून उपस्थितांची मने जिंकली. मार्गदर्शन करताना नानजीभाई ठक्कर यांनी विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन, नियमित अभ्यास, मोबाईल व सोशल मीडियाचा मर्यादित वापर आणि शिक्षक-पालकांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास करण्याचे आवाहन केले.

यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी शाळेसाठी ११ हजार रुपयांच्या बक्षिसाची घोषणा केली. शाळेचा यंदाचा निकाल १०० टक्के लागल्याबद्दल मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमात नानजीभाई ठक्कर यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

# कर्तव्यदक्ष लेखाधिकारी सतिश लहाने यांचा 'शिक्षक भारती'कडून यथोचित गौरव



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

- जलसंधारणमधून शिक्षण विभागात पदोन्नती झाल्याबद्दल अभिनंदन
- कैलास शिंदे यांचाही सन्मान

प्रशासकीय सेवेत आपल्या कामाचा ठसा उमटवणारे आणि नुकतेच जलसंधारण विभागातून पदोन्नती होऊन जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाच्या लेखा पडताळणी कार्यालयात लेखाधिकारी म्हणून रुजू झालेले सतिष लहाने यांचा 'शिक्षक भारती' संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्यालयात जाऊन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले.

यावेळी पुणे शिक्षण उपसंचालक कार्यालयातील कैलास शिंदे यांची देखील पदोन्नती झाल्याबद्दल संघटनेच्या वतीने त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या दुहेरी सत्कार सोहळ्याने शिक्षण विभागातील चैतन्याचे वातावरण पाहायला मिळाले.

**प्रशासकीय अनुभवाचा शिक्षकांना फायदा होईल**

सतिष लहाने यांनी जलसंधारण विभागात अत्यंत उत्कृष्ट काम केले असून, आता पदोन्नतीनंतर शिक्षण विभागात त्यांच्या अनुभवाचा मोठा फायदा जिल्ह्यातील शिक्षकांना होणार आहे. शिक्षक आणि प्रशासन यांच्यातील दुवा म्हणून लहाने साहेब सकारात्मक काम करतील, असा विश्वास शिक्षक भारतीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

**मान्यवरांची उपस्थिती**

या सत्कार प्रसंगी शिक्षक भारतीचे पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर, विनाअनुदान विरोधी संघर्ष समितीच्या राज्याच्या अध्यक्षा रूपालीताई कुरूमकर, जिल्हा संघटक चंद्रशेखर हासे, श्रीगोंदा महिला तालुकाध्यक्षा रूपालीताई बोरुडे, बळिराम फरगडे, दुधाडे, विक्रम आंबरे आदींसह शिक्षक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिक्षकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची ग्वाही सत्काराला उत्तर देताना सतिष लहाने यांनी शिक्षक भारती संघटनेचे आभार मानले. "शिक्षकांचे प्रलंबित देयके, भविष्य निर्वाह निधी आणि लेखा पडताळणी संबंधित कामांना प्राधान्य देऊन ते वेळेत पूर्ण करण्यासाठी मी कटिबद्ध राहील," अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

या कार्यक्रमामुळे नवनियुक्त अधिकाऱ्यांचे स्वागत तर झालेच, शिवाय शिक्षक भारती संघटनेने प्रशासनाशी सुसंवाद साधत शिक्षकांच्या हिताचा दृष्टीकोन मांडला. या उपक्रमाचे शिक्षण क्षेत्रात सर्वत्र कौतुक होत आहे. संघटनेच्या वतीने उच्च माध्यमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद,दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे,सहसचिव राहुल कानवडे ,तालुका अध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, साई थोरात,संपत वाळके,नानासाहेब खराडे, रूपालीताई बोरुडे,कल्पना चौधरी, मफीज इनामदार,दीपक फापाळे,गणपत धुमाळ,विजय पांडे, अमोल तळेकर,संतोष नवले,बाबासाहेब तांबे,अकील फकीर,बाबाजी लाळगे,वैभव चोथे,प्रवीण मालुंजकर,श्याम जगताप.

# विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी संपन्न

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांच्या आरोग्याप्रती जागरूकता निर्माण करण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भांडगाव येथे नुकतेच 'हिमोग्लोबिन तपासणी' शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या विशेष सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. आरोग्य संपन्न विद्यार्थी, हीच प्रगती शाळेत सातत्याने विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविले जातात. सद्यस्थितीत विद्यार्थी नियमितपणे 'प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण' योजनेअंतर्गत शालेय आहार घेतात. मात्र, या आहाराचा सकारात्मक परिणाम आणि विद्यार्थ्यांच्या शरीरातील रक्ताचे नेमके प्रमाण पालकांना कळावे, या उद्देशाने या विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांचीही आरोग्य तपासणी या शिबिरात केवळ विद्यार्थ्यांचीच नव्हे, तर शाळेतील शिक्षकांची देखील हिमोग्लोबिन आणि शुगर (मधुमेह) तपासणी करण्यात आली. सुदृढ शरीर असेल तरच अध्यापन आणि अध्ययन प्रभावी होते, हा संदेश यातून देण्यात आला. तज्ज्ञांचे मार्गदर्शन व सहकार्य सदर तपासणीकामी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य सेविका दुधाडे डी. डी., आरोग्य सेवक सुबे एन. ए. आणि आशा सेविका नंदा जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले. आरोग्य पथकाने विद्यार्थ्यांना सकस आहार आणि वैयक्तिक स्वच्छतेबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

## मुलिका देवी विद्यालयाची विद्यार्थिनी

# सानिका अनिल चौधरी हिचा सन्मान



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

मुलिका देवी विद्यालयाची विद्यार्थिनी व पत्रकार अनिल चौधरी यांची कन्या सानिका अनिल चौधरी हिने महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक मंडळ संलग्न अहिल्यानगर गणित अध्यापक मंडळ यांच्या वतीने घेण्यात आलेल्या गणित प्राविण्य परीक्षेत निघोज येथील मुलिका देवी विद्यालयाची विद्यार्थिनी सानिका अनिल चौधरी हिने पारनेर तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवील्याबद्दल सानिका हिचा मुलिका देवी विद्यालय तसेच पत्रकार संघ यांच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त शाल श्रीफळ तसेच सन्मानचिन्ह देऊन ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय उनवणे यांच्या हस्ते गौरविण्यात आले आहे. यावेळी प्राचार्य अंकुश अवघडे, उपप्राचार्य मोकळे सर, पर्यवेक्षक लक्ष्मणराव झंजाड , स्कूल कमीटीचे अध्यक्ष आप्पासाहेब वराळ पाटील, उपाध्यक्ष तथा पठारवाडी गावचे उपसरपंच दौलतराव सुपेकर तसेच सर्व शिक्षक तसेच पत्रकार संघातील सर्व सदस्य व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राचार्य अवघडे यावेळी बोलताना म्हणाले सानिका ही अतिशय हुशार विद्यार्थीनी आहे. तसेच गणित अध्यापक मंडळाने या विद्यार्थ्यांनीचे कौतुक केले आहे. ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय उनवणे यावेळी म्हणाले गेली अनेक वर्षांपासून मुलिका देवी विद्यालयाने गुणवंत विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शाळेचा नावलौकिक मोठा केला आहे. गेली वीस वर्षात या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा तसेच शालेय परिक्षा माध्यमातून मोठ्या प्रमाणात यश मिळवले असून राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून बहुतांश विद्यार्थी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. तसेच उद्योजक,व्यवसायीक या माध्यमातून या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शाळेचा नावलौकिक वाढवला आहे. प्राचार्य अंकुश अवघडे यांनी गेली वर्षभरात अनेक शैक्षणिक नवीन उपक्रम राबवून शाळेतील विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली आहे. शालेय शिक्षणाबरोबरच क्रिडा स्पर्धेत सुद्धा विद्यार्थी तालुका स्तरावर, जिल्हा स्तरावर तसेच विभागीय व राज्य स्पर्धेत यशस्वी कामगीरी करीत आहेत. सानिका चौधरी ही अतिशय गुणवंत विद्यार्थीनी असून आई वडील यांचे मार्गदर्शन तसेच शिक्षकांचे महत्वपूर्ण योगदान मिळाल्याने गणित या विषयात प्राविण्य मिळवीत तालुका स्तरावर प्रथम क्रमांक मिळवीला आहे. स्कूल कमीटीचे अध्यक्ष आप्पासाहेब वराळ पाटील यावेळी म्हणाले गेली वर्षभरात प्राचार्य अंकुश अवघडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन होण्यासाठी परिश्रम घेतले विशेष शैक्षणिक योजना राबवली यामुळे विद्यालयाचा नावलौकिक राज्यात झाला असून संस्था पदाधिकारी व ग्रामस्थ यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पाठबळ मिळत असल्याने मुलिका विद्यालयाचा शैक्षणिक स्तर उंचावला असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेहबूब इनामदार यांनी केले.

# अमळनेरमध्ये 'पोलीस-पत्रकार महोत्सव' उत्साहात संपन्न

## विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान; सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय





**अमळनेर : (समर्थ गांवकरी)**

पत्रकार दिनाचे औचित्य साधून अमळनेर येथे मंगळवार, दि. ६ जानेवारी रोजी सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात भव्य असा 'पोलीस–पत्रकार महोत्सव' मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व अमळनेर पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सोहळ्यामुळे पोलीस व पत्रकार यांच्यातील समन्वय, परस्पर विश्वास व सामाजिक बांधिलकीचे प्रभावी दर्शन घडले.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री ॲड. विजय नवल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे होते. यावेळी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, माजी नगराध्यक्षा जयश्री पाटील यांच्यासह राजकीय, प्रशासकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दर्पणकार बाळशास्त्री जांबेकर व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

उदघाट्न भाषणात माजी केंद्रीय मंत्री ऍड विजय नवल पाटील यांनी सांगितले की, पोलीस आणि पत्रकार यांची सामाजिक बांधिलकी ही उल्लेखनीय आहे.

पत्रकार हा समाजमानचा आरसा तर नागरिक आणि शासनां मधील दुवा असतो. पत्रकारिता ही समाजातील अनिष्ठ घटनावर प्रहार करणारी तर चांगल्या गोष्टी प्रकाशात आणण्यासाठी असली पाहिजे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा आपल्या वृतपत्राद्वारे




सामाजिक अनिष्ठ प्रथेवर आसूड ओढून समाजात अमूलाग्र बदल घडवीला. सत्ता स्थित्यातंरात पत्रकार हा अहम भूमिका बजावत असतो तर पोलीस हा सामाजिक आरोग्य सुदृढ राखण्यात कसोशीने प्रयत्नशील असतो. याप्रसंगी पोलीस व पत्रकार दिना निमित्ताने घेण्यात आलेल्या मैत्रीपूर्ण क्रिकेट सामनातील विजेत्या पोलीस संघाला मान्यवरांच्या हस्ते विजेती ट्रॉफी देण्यात आली. सामनातील उत्कृष्ट फलंदाज प्रल्हाद सूर्यवंशी यांना तर उत्कृष्ट गोलंदाज राहुल पाटील यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

तसेच गीत गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक पत्रकार मुन्ना शेख, निबंध स्पर्धेत गट अ मधील प्रथम क्रमांक दिक्षिता भामरे, गट ब मध्ये श्रुती शिरसाठ, गट क मध्ये कृष्णा निकम यांना विशेष सन्मान चिन्ह व सहभाग प्रशस्ती पत्र देण्यात आले.

तसेच पत्रकार संघटने कडून खान्देशी कलाकारानां ही विशेष सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले.

समाजाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांना यावेळी विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

त्यामध्ये—आ. अनिल भाईदास पाटील व ओमप्रकाश मुंदडा ( अमळनेर भूषण),ॲड. विजय नवल पाटील व भिकन पाटील (शिक्षण महर्षी) प्रा शिवाजीराव पाटील (साहित्य रत्न)पांडुरंग पाटील (जीवन गौरव (पत्रकारिता) मंगळग्रह मंदिर देवस्थान(आदर्श देवस्थान)डॉ. जी. एम. पाटील (आरोग्य देवदूत)डॉ. प्रशांत शिंदे (आदर्श आरोग्य सेवादूत)महेश पाटील( आदर्श लोकसेवक) अमळनेर वाहतूक पोलीस विभाग( उत्कृष्ट सेवा)सिद्धांत सिसोदे (आदर्श पोलीस कर्मचारी)अनिता सुरडकर (आदर्श शिक्षिका) कैलास पाटील (उद्योगरत्न)विक्की जाधव (आदर्श उद्योजक)प्रितेश पारख, रोनक संकलेचा, जितेंद्र गुंजाळ, प्रेमकुमार सासनाणी ( युवा उद्योजक)किरण (कृष्णा) बहारे (समाज भूषण) ज्ञानेश्वर धनगर (आदर्श समाजसेवक)सौ. रिता बाविस्कर (आदर्श सामाजिक कार्यकर्त्या)प्रवीण पाटील (उत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ता)डिगांबर वाघ (उत्कृष्ट अभियंता)एकनाथ सोनवणे (आदर्श वृत्तपत्र वितरक) गोविंद गायकवाड (उत्कृष्ट गायक) रविंद्र भोई (उत्कृष्ट कलाकार) अजय शिवरामे (आदर्श कर्मचारी) पारस गोल्ड (आदर्श सुवर्णकार) नितीन पाटील( आदर्श सरपंच)

सदरच्या महोत्सवात खानदेशातील अहिराणी कलाकार पुष्पा ठाकूर,गोविंद गायकवाड, रवींद्र भोई,भैया मोरे, शशांक संदानशिव,अल्ताफ राजा, जगदीश, आकाश पवार,राजा दाभाडे आदींनी आपल्या नृत्य व गायनाने उपस्थितांचे मन जिंकली.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश काटे व प्रसिद्धी विनोदी कलाकर विलास शिरसाठ यांनी केले तर आभार प्रा डॉ विजय गाढे यांनी केले.

हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. यामध्ये प्रामुख्याने:डॉ. समाधान मैराळे (उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष, इलेक्ट्रॉनिक मीडिया विभाग तथा तालुकाध्यक्ष)प्रा. डॉ. विजय गाढे (खान्देश उपाध्यक्ष)सुरेश कांबळे (जिल्हा सरचिटणीस)यदुवीर पाटील (जिल्हा उपाध्यक्ष)नूर खान पठाण व प्रवीण बैसाणे (तालुका उपाध्यक्ष)आत्माराम अहिरे (तालुका संघटक)हितेंद्र बडगुजर (तालुका कार्याध्यक्ष) गणेश चव्हाण (तालुका प्रसिद्धीप्रमुख)सुरेंद्र जैन, राहुल भदाणे, रिजवान मनियार, योगेश वाणी, सत्तार खान, किशोर वाणी (तालुका सदस्य)या सर्व टीमच्या नियोजनामुळे व एपीआय शिरसाठ,पीएसआय समाधान गायकवाड, पोकॉ सिद्धातं सिसोदे यांच्या विशेष सहकार्य मुळे हा सोहळा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. पोलीस आणि पत्रकारांच्या या एकत्र येण्यामुळे शहरात सलोख्याचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# सिस्पे घोटाळ्याच्या चौकशीचे स्वागत!

- सर्वसामान्य ठेवीदारांना न्याय मिळायलाच पाहिजे: खा. नीलेश लंके
- खा. लंके यांनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार!



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सिस्पे घोटाळ्याच्या चौकशीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या घोषणेचे स्वागत करत खासदार नीलेश लंके यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत.

पत्रकारांशी बोलताना खा. लंके म्हणाले की, शिस्पे घोटाळ्यात सर्वसामान्य नागरिकांचे कष्टाचे पैसे अडकले असून अनेकांनी दोन पैशांच्या आशेने गुंतवणूक केली आणि त्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले. काही दुर्दैवी ठेवीदारांनी आत्महत्येचा टोकाचा निर्णय घेतला. त्यामुळे या घोटाळ्याची सखोल, निष्पक्ष चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे.

खा. लंके म्हणाले, "ज्यांनी हा घोटाळा केला आहे, त्यांना अटक झाली पाहिजे आणि त्यांच्याकडून ठेवीदारांचे पैसे वसूल करून सर्वसामान्य नागरिकांना परत मिळाले पाहिजेत." सिस्पे घोटाळा उघडकीस आल्यानंतर आपण काही ठेवीदारांना सोबत घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली होती. हा विषय राजकीय न करता केवळ ठेवीदारांचे पैसे मिळवून देणे हीच आपली भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विरोधकांकडून आपल्यावर बिनबुडाचे आरोप केले जात असून राजकीय आकसापोटी आपल्याकडे बोट दाखवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत खा. लंके यांनी विखे पिता-पुत्रांवर अप्रत्यक्ष टोला लगावला. "स्वतःचे झाकून ठेवायचे आणि दुसऱ्यांचे उघडे करायचे, हीच त्यांची सवय आहे," असे ते म्हणाले.

खा. लंके पुढे म्हणाले की, सिस्पे प्रकरण अतिशय गंभीर आहे. मात्र जेव्हा केंद्रीय मंत्री लोणी किंवा कोपरगावच्या दौऱ्यावर येतात, तेव्हा त्यांना सिस्पे घोटाळ्याच्या चौकशीसाठी निवेदन का दिले जात नाही, असा सवाल त्यांनी विखे यांचे नाव न घेता उपस्थित केला. ठेवीदारांचे पैसे मिळवून देण्याऐवजी काहीजण पालकमंत्र्यांच्या माध्यमातून राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. मतदारांचे लक्ष विचलित करण्यासाठी डाव आखले जात असले तरी नगर जिल्ह्यातील मतदार सुज्ञ असून भाजपची खेळी सर्वांनी ओळखली असल्याचे लंके यांनी सांगितले. नगर येथील सभेत मुख्यमंत्री शहरातील रस्ते घोटाळ्यावर एक शब्दही न बोलल्याची टीकाही त्यांनी केली.

जिल्ह्यात दहा लाखांपासून एक कोटी रुपयांपर्यंतच्या ऑनलाईन फसवणुकीचे प्रकार घडले असून त्यासंदर्भात गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणांचीही सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी खा. लंके यांनी केली. ग्रो मोअर इन्व्हेस्टमेंट फायनान्स कंपनीने शिर्डीसह इतर जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर फसवणूक केली असून सुमारे ३०० कोटी रुपयांचा हा घोटाळा असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शेवगाव येथे शेअर मार्केटच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असून त्याची चौकशी सीबीआयकडे देण्यात यावी, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

मुख्यमंत्र्यांनी शिस्पे घोटाळ्याची चौकशी सीबीआयकडे देण्याची घोषणा केल्यावर प्रतिक्रिया देताना खा. लंके म्हणाले, "जर राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांनाच राज्याच्या पोलिसांवर विश्वास नसेल, तर सर्वसामान्य नागरिकांनी कोणावर विश्वास ठेवायचा?" श्रीरामपूर आणि शिर्डी येथे झालेल्या गोळीबाराच्या घटनांचीही सीबीआयमार्फत चौकशी व्हावी, यासाठी पालकमंत्र्यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे हे नियमितपणे आपले कर्तव्य बजावत असताना त्यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न सत्ताधारी पक्षाकडून सुरू असल्याचा आरोप खा. लंके यांनी केला. पोलीस दलावर वारंवार टीका करून काही नेते जाणीवपूर्वक त्यांची बदनामी करत असून कार्यक्षम अधिकाऱ्यांना नामोहरम करण्याचा हा प्रयत्न असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, शिस्पे-इन्फिनिटी घोटाळ्याशी आपला कोणताही संबंध नसल्याचे खा. नीलेश लंके यांनी ठामपणे स्पष्ट केले. केवळ इन्फिनिटीच्या उद्घाटनाला उपस्थित राहिलो म्हणून जाणीवपूर्वक बदनामी केली जात असून हा राजकीय हेतूने चालवलेला खोटा प्रचार असल्याचे त्यांनी सांगितले. उद्घाटन कार्यक्रमाला विविध पक्षांचे आमदार, खासदार, सामाजिक कार्यकर्ते व पोलीस अधिकारी उपस्थित होते. "उद्घाटनाला उपस्थित राहणे म्हणजे घोटाळ्यात सहभागी असणे नव्हे," असेही त्यांनी स्पष्ट केले.

आपण किंवा आपल्या सहकाऱ्यांनी कोणालाही पैसे गुंतवण्यास प्रवृत्त केलेले नसून, उलट ठेवीदारांचे पैसे परत मिळावेत यासाठी सातत्याने प्रयत्न केले असल्याचे त्यांनी नमूद केले. महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून दबावतंत्र वापरले जात असल्याचा आरोप करत काही ठिकाणी धमक्या देणे, खोटे गुन्हे दाखल करणे असे प्रकार घडल्याचे त्यांनी सांगितले.

महाविकास आघाडीचा विचार महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित असून नगर शहराने शांतता, विकास आणि पारदर्शक कारभारासाठी या विचारांच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहनही खासदार नीलेश लंके यांनी केले.

महानगरपालिकेतील कथित भ्रष्टाचार, रखडलेल्या विकास योजना, पाणीपुरवठा व मनमानी कारभाराचा पर्दाफाश केल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नसल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

## जेंडर व प्रजनन आरोग्य हक्कांवर प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

**जामखेड तालुका (समर्थ गांवकरी)**

पंचायत समिती,जामखेड व ग्रामीण विकास केंद्र,जामखेड यांच्या संयुक्त विद्यमाने जामखेड तालुक्यातील भटक्या-विमुक्त समुदायातील महिला सामाजिक कार्यकर्त्या, एकल महिला, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, एकल महिला व आरोग्य कार्यकर्त्यांसाठी "जेंडर (लिंगभाव समानता) व महिलांचे प्रजनन आरोग्य हक्क" या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा मंगळवार, दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी जामखेड येथील महावीर मंगलकार्यालयात यशस्वीरीत्या पार पडली या कार्यशाळेत तालुक्यातील ३०० हून अधिक महिला सहभागी होत्या.कार्यशाळेचे उद्घाटन सहभागी महिला व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते समाजातील अनिष्ट रूढी-परंपरांचे प्रतीकात्मक



फुगे फोडून करण्यात आले. याचसोबत बालविवाह मुक्त समाज घाडवुयात अशी शपथ घेण्यात आली. यावेळी ग्रामीण आरोग्य प्रकल्पाच्या डॉ. शोभाताई आरोळे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच रोहिणी येलपणेकर (विस्तार अधिकारी, आरोग्य विभाग), हिरा सानप (प्रकल्प अधिकारी, बालविकास प्रकल्प), उमाताई जाधव (सचिव, ग्रामीण विकास केंद्र), गोविंद बदने ( तालुका संरक्षण अधिकारी) विजय शेवाळे (शिक्षण अधिकारी ) व अ‍ॅड. हर्षल एन. डोके (कायदेशीर सल्लागार, ग्रामीण विकास केंद्र) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सकाळच्या पहिल्या सत्रात "जेंडर (लिंगभाव), पितृसत्ता व महिलांचे आरोग्य" या विषयावर सम्यक संवाद व संसाधन केंद्र, पुणेचे संचालक मा.आनंद पवार यांनी मार्गदर्शन केले. समाजातील लिंगभाव असमानता, पितृसत्ताक रचना आणि त्याचा महिलांच्या आरोग्यावर होणारा परिणाम याविषयी त्यांनी सखोल विवेचन केले. दुसऱ्या सत्रात "महिलांचे प्रजनन आरोग्य आणि हक्क" या विषयावर सम्यक संवाद व संसाधन केंद्र, पुणेचे व्यवस्थापकीय संचालक तसेच टाटा इन्स्टिट्यूट, मुंबईचे संशोधक प्रितम पोतदार यांनी मार्गदर्शन केले. महिलांचे कायदेशीर हक्क, आरोग्य सेवांपर्यंत पोहोच तसेच माहितीपूर्ण निर्णय घेण्याचे महत्त्व यावर त्यांनी विशेष भर दिला.

समारोप सत्रात सहभागी महिलांनी आपल्या अनुभवांचे व मतांचे सादरीकरण केले. या प्रशिक्षणामुळे महिलांमध्ये जेंडर संवेदनशीलता, प्रजनन आरोग्याविषयी जागरूकता व हक्कांची जाणीव निर्माण झाल्याचे सहभागींच्या प्रतिक्रियांतून स्पष्ट झाले.

## हत्येप्रकरणी हिमायतनगर येथे रास्ता रोको आंदोलन

**हिमायतनगर : (समर्थ गांवकरी)**

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये लातुरात नवोदय विद्यालयात संशयास्पद मृत्यू झाला होता. ही घटना संपुर्ण महाराष्ट्रात सोशल मीडियाच्या माध्यमातून पसरली आहे.हि घटना लातुर जिल्ह्यात जवाहर नवोदय विद्यालयात सहावीच्या वर्गात शिकणाऱ्या हुशार मातंग समाजाच्या विद्यार्थिनीचा मृत्यू झाला नसुन,तो घातपात असुन विद्यालयातील पलंगाला लटकलेल्या अवस्थेत तिचा मृतदेह आढळला आहे. अभ्यासाचा ताण की घातपात प्रशासनानेअद्याप स्पष्ट लेखी उत्तर दिलेले नाही.कुमारी अनुष्काचा घात झाला असल्याचा आरोप आई वडील आणि सामाजिक संघटनाना केला आहे.

नवोदय विद्यालयातील सीसीटीव्ही कॅमेरा चेक करुन संबंधित अधिकाऱ्यांची तात्काळ



चौकशी करुन त्यांच्यावर तात्काळ खुनाचा गुन्हा दाखल करवा.

पीडित कुटुंबाला लवकरात लवकर न्याय मिळावा.विद्यार्थीनी सुरक्षितता व मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये.अशा घटना पुन्हा घडू नयेत या साठी कठोर पावले उचलली जावीत.

स्वतंत्र एसआयटी चौकशी समिती नेमुन सदरील प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी. अन्यथा येणाऱ्या काळात मातंग समाज कायदा हातात घेतल्या शिवाय शांत बसणार नाही.या निषेधार्थ नांदेड किनवट राष्ट्रीय महामार्गावरील चौकात येत्या दि.१२/०१/२०२६.रोज सोमवारी दुपारी ठिक बारा वाजता भव्य बेमुदत रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.यावेळी लहुजी शक्ती सेना हिमायतनगर तालुकाध्यक्ष राजुभाऊ गायकवाड व लोकस्वराज्य आंदोलनाचे मराठवाडा कार्याध्यक्ष धोंडोपंत बनसोडे,जेष्ठ पत्रकार दिलीप शिंदे, अँड ज्ञानेश्वर पंदलवाड,पत्रकार धम्मपाल मुनेश्वर,आंनद जळपते,सदानंद पतंगे,देवानंद गुंडेकर,राम चिंतलवाड, शुध्दोधन हनवते,यादव येणेकर,माधव कांबळे प्रशांत राहुलवाड,मारोती गाडेकर, निलेश चटणे यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती.या भव्य बेमुदत रास्ता रोको आंदोलनाला तालुक्यातुन हजारोंच्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित राहावे. कारण या चिमुकलीला न्याय मिळवुन देण्यासाठी समाजाच्या विविध सामाजिक संघटना सामील झाल्या आहेत.असे आवाहन धोंडोपंत बनसोडे व राजुभाऊ गायकवाड यांनी आपल्या निवेदनात सांगितले आहे.

## नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार 'ॲक्शन मोड' मध्ये

- शहरातील समस्या तातडीने सोडविण्याच्या सूचना

**किनवट : (समर्थ गांवकरी)**



किनवट नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर तात्काळ प्रशासन आणि नवनियुक्त नगरसेवकांची संयुक्त बैठक घेऊन शहरातील मूलभूत समस्या सोडविण्यासाठी समन्वयाने काम करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. या बैठकीत नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार 'ॲक्शन मोड' मध्ये दिसून आल्या.

या बैठकीत शहरातील प्रत्येक प्रभागातील स्वच्छता व्यवस्था, नियमित व सुरळीत पाणीपुरवठा, सार्वजनिक दिवाबत्ती, रस्ते, नाल्यांची साफसफाई तसेच नागरिकांना मिळणाऱ्या प्रशासकीय सेवांमध्ये सुधारणा करण्यावर भर देण्यात आला. "नगर परिषद प्रशासन, नगरसेवक व त्यांचे प्रतिनिधी यांच्यात योग्य समन्वय राहिल्यासच नागरिकांच्या समस्या वेळेत सुटू शकतात," असे प्रतिपादन नगराध्यक्षा सौ. येंड्रलवार यांनी केले. प्रत्येक प्रभागातील समस्या थेट प्रशासनापर्यंत त्वरित पोहोचाव्यात यासाठी नगर परिषदच्या सर्व विभागांचे दूरध्वनी क्रमांक नगरसेवक, त्यांचे प्रतिनिधी तसेच संबंधित कर्मचाऱ्यांकडे उपलब्ध असणे आवश्यक असल्याचे निर्देश त्यांनी दिले. यामुळे तक्रारींचे निराकरण जलदगतीने होऊन नागरिकांना दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, स्वच्छता कर्मचाऱ्यांची उपस्थिती, पाणीपुरवठ्यातील अनियमितता, बंद असलेली दिवाबत्ती, तसेच कार्यालयीन कामकाजातील विलंब यावर कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी संबंधित विभागप्रमुखांना जबाबदारीने काम करण्याचे आदेश दिले. या बैठकीस मुख्याधिकारी मुंगाजी काकडे, कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव, नगर परिषदचे विविध विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान नगरसेवकांनीही आपापल्या प्रभागातील समस्या मांडल्या, त्यावर नगराध्यक्षा व प्रशासनाने सकारात्मक चर्चा करत तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

नागरिकाभिमुख, पारदर्शक व गतिमान प्रशासन देण्याचा निर्धार करत सौ. सुजाता येंड्रलवार यांनी "किनवट शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय आहे," असे ठामपणे सांगितले.

## इगतपुरी-विल्होळी मार्गावरील शौचालयांची दयनीय अवस्था

- घोटीकरांसाठी मूलभूत सुविधांचा प्रश्न ऐरणीवर भाजपचे रवी गव्हाणेंची NHAIकडे तातडीची मागणी

**इगतपुरी : (समर्थ गांवकरी)**

मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर घोटी येथे उड्डाणपूल उभारण्यात आला असून घोटी ही संपूर्ण तालुक्याची मुख्य बाजारपेठ असल्याने या परिसरात नागरिकांची दिवसभर मोठी वर्दळ असते. मात्र उड्डाणपूलाची निर्मिती करताना येथे सुलभ शौचालयाची व्यवस्था करण्यात न आल्याने नागरिकांना, विशेषतः महिला व वृद्धांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.तसेच इगतपुरी ते विल्होळी येथे असणारे सुलभ शौचालय यांची खूप दूर अवस्था झालेली आहे सार्वजनिक ठिकाणी मूलभूत सुविधांचा



अभाव असल्याने प्रवासी, व्यापारी व स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ही गंभीर समस्या येथील नागरिक व महिलांनी भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष रवी गव्हाणे यांच्यासमोर मांडली. नागरिकांच्या तक्रारींची तत्काळ दखल घेत रवी गव्हाणे यांनी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे (NHAI) उप महाप्रबंधक तथा परियोजना निदेशक श्रीकांत ढगे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

यावेळी घोटी उड्डाणपूल परिसरात तात्काळ सुलभ शौचालय बांधण्यात यावे, तसेच त्याच्या देखभाल व स्वच्छतेसाठी कायमस्वरूपी एक कर्मचारी तैनात करण्यात यावा तसेच इगतपुरी ते विल्होळी येथे असणारे सुलभ शौचालय यांची खूप दयनीय अवस्था झालेली आहे त्याची त्वरित दुरुस्ती करून तेथेही एक एक कर्मचारी देण्यात यावा. अशी ठोस मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. घोटी हे तालुक्याचे व्यापारी व दळणवळणाचे केंद्र असल्याने येथे येणाऱ्या महिला, विद्यार्थी, प्रवासी व व्यापाऱ्यांसाठी ही सुविधा अत्यंत आवश्यक असल्याचे गव्हाणे यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी भाजपचे रवी गव्हाणे,ज्येष्ठ नेते उत्तमराव भोसले, भास्कर गुंजाळ, पाडळी गावचे उपसरपंच बाळासाहेब आम्ले, मा. घोटी शहर अध्यक्ष दीपक जोशी यांच्यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

घोटी परिसरातील नागरिकांनी या पाठपुराव्याबद्दल समाधान व्यक्त केले असून, लवकरात लवकर सुलभ शौचालयाची उभारणी होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. ही सुविधा उपलब्ध झाल्यास महिलांसह सर्व नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## कामठा येथे कर्करोग तपासणी शिबीर यशस्वी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

अर्धापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र मालेगाव अंतर्गत आरोग्य उपकेंद्र कामठा बु. येथे कर्करोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सगिता देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीकांत देसाई यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे संपन्न झाले.

या शिबिरास तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीकांत देसाई, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्याम सावंत, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. डाढाळे, दंतरोग तज्ज्ञ डॉ. कोळेकर तसेच विस्तार अधिकारी डॉ. एस. पी. गोखले उपस्थित होते. तपासणीसाठी आलेल्या लाभार्थ्यांना कर्करोग आजाराविषयी माहिती देत वेळेवर तपासणीचे महत्त्व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीकांत देसाई यांनी स्पष्ट केले. कामठा येथे झालेल्या कर्करोग तपासणी शिबिरात एकूण ९० रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये मुख कर्करोग तपासणी ९०, स्तन कर्करोग तपासणी ३९, गर्भाशयमुख कर्करोग २४ जणांची तपासणी करण्यात आली. तसेच एकूण १३ रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले आहे. कर्करोग तपासणी शिबीर यशस्वी करण्यासाठी आरोग्य सहायक अरुण गादगे, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. लिना बनसोडे, बी.सी.एम. फेरोज शेख, एजाज शेख, उपकेंद्रातील ए.एन.एम. भाले व खुळे सिस्टर, एम.पी.डब्ल्यू. मांजरमकर, उपकेंद्रातील सर्व कर्मचारी, आशाताई व अंगणवाडी सेविका यांनी विशेष परिश्रम घेतले.

## राष्ट्रीय सेवा योजनेतून सर्वांगीण विकास : डॉ. भाऊसाहेब खिलारी

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असून समाजकार्यातून सेवाभाव किती महत्वाचा आहे हे याच श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समजत असल्याने राष्ट्र निर्मीतीसाठी अशा श्रमसंस्कार शिबिराची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाचे सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी व्यक्त केले आहे. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे, श्री मुलिका देवी महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन चिंचोली ता. पारनेर या ठिकाणी डॉ.भाऊसाहेब खिलारी यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहाने पार पडले. त्यावेळी वृक्षाला पाणी घालून उद्घाटन झाले. उद्घाटन



प्रसंगी डॉ.भाऊसाहेब खिलारी बोलत होते. मळगंगा मातेच्या मंदिर परिसरात निसर्गरम्य वातावरणात या शिबिराचे आयोजन केले होते. ते म्हणतात, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा श्रमसंस्कार शिबिरामार्फत होतो. समाजाचे वास्तव ओळखण्याचे स्वीकारण्याची आणि सेवाभाव रुजविण्याची ही एक प्रभावी कार्यशाळा आहे. आदर्श नागरिक घडविण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करीत आहे.

स्वच्छता, वृक्षारोपण, रक्तदान, आरोग्य याविषयी जनजागृती अभियान, ग्रामीण भागातील सेवाभाव ही मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजली पाहिजेत. संघ भावना, शिस्त, सामाजिक बांधिलकी विद्यार्थ्यांनी वृक्ष संवर्धन काळाची गरज आहे असे त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात श्रमसंस्कार, विद्यार्थ्यांचा विकास आणि गावाचा विकास होतो. अशी राष्ट्रीय सेवा योजना राबविणे काळाची गरज आहे. 'माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी' या ब्रीद वाक्याची जाणीव स्वयंसेवकांना करून दिली. येथील मंदिराचे पावित्र्य जपा. शिस्त पाळा, वेळेचं महत्त्व समजून घ्या. दुसऱ्याच्या आनंदात सहभागी व्हा. महाविद्यालयाचे नाव उज्वल करा. असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. भाऊसाहेब खिलारी, मुलीकादेवी विद्यालयाचे माजी प्राचार्य सुपेकर सर यांचा सत्कार प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. अशोक कवडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. योगेश कवळे यांनी केले तर आभार प्रवीण सरडे यांनी मानले. सह कार्यक्रम अधिकारी प्रा. वृषाली भोसले, प्रा. हर्षदा पंडित, प्रा. उघडे, प्रा. ठाणगे डॉ. मनीषा गाडीलकर, डॉ. गोरक्ष घोलप, प्रा. वागदरे प्रा. भारस्कर आदी प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.